म. [illegible] ाणे
विषय
सं. नं.

REFBK-0000387

सं. ३ ४०

ग्रंथ संग्रहा

धनुर्धारिरचित—

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# पानपतचा मोहरा.

जनार्दन महादेव गुर्जर,

बुक्सेलर आणि पब्लिशर, रामवाडी, मुंबई,

ह्यांनीं छापून प्रसिद्ध केला.

REFBK-0000387

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ५ आणे.

मुंबईंत,
जावजी दादाजी यांच्या
" निर्णयसागर " छापखान्यांत छापिलं

# पानपतचा मोहरा.

## प्रकरण १ लें.

**गोपिकाबाई**—मग नाहींच का आमचं ऐकायचं? तुह्मीं आजवर दुजाभाव मनांत कसा तो आणलाच नाहीं आणि आतांच मेला हा हट्ट कोठून आला?

**सदाशिव भाऊ**—वईनी, तो माझा निश्चय कायम झाला. त्यांत नाहीं आतां अंतर पडायचें. जाऊंद्याच मला एकदां हिंदुस्थानांत. आह्मी शूर गडी आहोंत. लढाई, समरभूमी ह्मणजे आह्मांला लग्नाची वऱ्हात वाटते; आणि मी ह्मणतों, तुह्मी इतका आग्रह कां धरितां? गिलची ह्मणजे मला तर कःपदार्थ वाटतो. दुस्मानाच्या नरडीचा घोट घेतलाच पाहिजे. अरे हरामखोर! गमजा चालवितां होय!! ही समशेर अजून नाहीं वाटतें तुह्मीं पाहिलीत? सदाशिव भाऊ तुमचा काळच जन्मला समजा. आजवर लुटतात आमचा देश, त्याचें उट्टें आतां चांगलें घेऊं, तरच नांवाचे आह्मीं हिंदु.

**गोपिकाबाई.**—तें सारं खरं हो भावोजी! तुह्मी शूर आहांत, त्या अविंधांचे कृतांतकाळ आहांत, सर्व खरं. पण, आमची इकडे कोण वाट? तुह्मां दोघांची जोडी ह्मणजे रामलक्ष्मणांची. तुमच्या बाहेर कोणी काडीभर तरी जात आहे का? घरीं फार फार वाईट वाटतं आहे. तिकडे करमायाचं सुद्धां नाहीं. आणखी गिलच्यांवर तुह्मींच का जावयाला हवं? पण तें मातबर माणसं थोडींथोडकीं कांहीं नाहींत. हिंदुस्थान तिचा पल्ला. त्यांतून गांठ मेली त्या अर्बुद जातीशीं. इकडला

सारा कारभार तुमच्यावर, ह्मणून ह्मणतें कीं, नका जाऊं. आणखी या दुराण्यावर खासा स्वारी ती कशाला हवी?

स० भाऊ—तें कांहीं नव्हे वईनी, बस्स, ठरला बेत कायम. खासा स्वारीच गिलच्यावर जाणार. पहाल तर खरें, दुराणी कुठें होता कीं नव्हता असें करून सोडतों! वईनी, अशा तुह्मी भितां कां? समजा खास कीं, हा भाऊ गिलच्यास ठार बुडवून आलाच ह्मणून. दुस्मानाची नको आतां क्षणभर सुद्धां उपेक्षा! काय? या मात्रागमन्यांनीं शिंदे, होळकर अशांचा पराभव केला? पुण्यप्रतापी सदायशवंत पेशवे सरकार आणि त्यांच्या मातबर सरदारांचा, या चांडाळ अविंधांनीं पराभव करावा? वईनी, मी येथें राहावें अशी गोष्ट तुह्मी काढूं नकाच. सारें हिंदुस्थान आतां पालथें पाडून येईन तेव्हांच या भाऊच्या जिवाला स्वस्थता. आणखी हे शिंदे होळकर कीं नाहीं, बरेच दिवस थोडेसे लांब राहिले आहेत. त्यांनां वाटतें इकडे पुण्याला सर्व ब्राह्मण जमून—अरे थांबा, हा आलोंच तुह्मांला माझी समशेर दाखवावयाला. वईनी, तुह्मी कां माझ्या उगीच आड येतां? बोलावूं पाठविलेंत ह्मणून आलों. मला नाहीं पडत चैन. माझ्या डोळ्यांत ते गिलची सारखे खुपताहेत. त्यांना हा कंठस्नान घालील तेव्हांच या भाऊला अन्नपाणी गोड लागेल. बरें, जाऊं तर आतां?

गो०—तसं नव्हे भावोजी. तुह्मी ह्मणतां तें सारं खरं. पण असं बघा, तुह्मी तिकडे हिंदुस्थानांत गेलां ह्मणजे इकडे पुण्यास कोण बरं आहे? इथल्या मनसुब्यांची वाट काय? तुमच्या खेरीज आह्मांला बिलकुल चैन पडावयाचं नाहीं. आणखी सांगतें, खासा स्वारीनं असं तुटून पडायला कधीं जाऊं नये. बोलून चालून ते अफगाण. अर्बुद जात मेल्यांची. आहेत आपले शिंदे

होळकर, फारां दिवसांचे इमानी मातबर नौकर, द्या त्यांच्याकडे सैन्य पाठवून ह्मणजे झालं. तुह्मीच कशाला जायाला हवं ? अहो, 'शीर सलामत तो पगडी पचास' अशी कायशी तुमची ह्मण आहेना ? मी नाहीं हां भावोजी तुह्मांला जाऊं देणार.

भाऊ—वईनी, काय हें तुह्मी असं बोलतां ? मी काय मर्द गडी नव्हें असें तुह्मांला वाटतें ? काय या गिलच्याची बिशाद लागली आहे ? झटक्यासरशी देईन अशी छाटाछूट उडवून कीं हां ह्मणत राहवें. किती झालें तरी क्षत्रियाचा बाणा पडला. मरण ह्मणजे—आणि त्यांतून समरभूमींतलें—आह्मांला शुभ कार्यच. त्याचें काय इतकें ? ह्मणून ह्मणतों या भाऊपुढें बायकांच्या मसलती नका सांगूं ! तो ऐकणारा नव्हे. सारा गिलची ठार बुडवील, होता कीं नव्हता करील, तेव्हांच तुह्मां सर्वांस तोंड दाखवावयाला हा भाऊ येईल बरें ? भाऊशीं गांठ मोठी कठिण !

गो०—होय, त्या सर्व गोष्टी खऱ्या–अगदीं खऱ्या–आहेत ह्मणतेंना मी ? पण लढाईचा प्रसंग मेला मोठा वाईट. आणि त्यांतून असं आह्मांला इकडे एकीकडे टाकून जाणं तुह्मांला चांगलं नव्हे, एवढ्याच करितां मी ह्मणतें कीं—

भाऊ—छेः, तें कांहीं आतां वईनी तुह्मी बोलूं नका. एकदां ठरलेला मनसुबा कुठें या भाऊपुढें फिरत असतो ? ह्मणून साफ अगोदरच सांगतों कीं, आतां कांहीं आग्रह करण्याच्या भरीला तुह्मी पडूं नका. हिंदुस्थानच्या मोहिमेवर खासा स्वारी जाणार हें ठरलें कायम. आतां काय त्याचें ?

गो०—भावोजी, हा असा दुराग्रह कांहीं चांगला नव्हे बरें ? मी सांगतें ऐका. अहो, आजवर तुह्मीं इतकं पाणी प्या ह्मटलंत तर तितकंच आह्मी पिऊन राहिलों. तुमच्या मर्जीबाहेर सांगा

वरं तुह्मीच, कोण कधीं गेलं आहे काय तें ? आणि आतांच कोणा मेल्या चहाडबुचक्यानं काय भरतंसल्तं सांगितलंन् कोण जाणे, आणि त्याच्यावर कसा तुमचा भरंवसा बसतो काय कीं !

**भाऊ**—वईनी, तुमचे सर्व एकांत मला कळतात. तुमच्या मनचा किंतु मीं ओळखला आणि तुह्मां सर्वांची खात्री करावी ह्मणूनच हा असा हिंदुस्थानांत चाललों समजलांत ? सख्खे भाऊ आणि चुलत भाऊ यांच्यांत अंतर पुष्कळ असतें, तें कांहीं आजकालचें नव्हे. ती जगाचीच रीत आहे. काय ह्मणे दादासाहेबांस खजीना द्या आणि मग मोहिमेवर पाठवा. कशाला ? घरचा खजीना नेल्यावर बाहेरचा काय मिळवावा ? आयत्या पिठावर रेघा ओढणारे बहुत असतात, समजलांत ? दादासाहेब सख्खे आणि आह्मी चुलत तें काय खोटें ? त्यालाहो कशाला इतके एकांत आणि बेकांत ? तेव्हां तें कांहीं नव्हे. माझा ठरला हाच मनसुबा कायम. आतां एकदांचा हा गिलची ठार बुडवीन तेव्हांच पुण्यास येईन !

**गो०**—भावोजी, नव्हे बरं हें चांगलं. लबाडलुच्यांचं ऐकून भलतंच तुमच्या मनांत शिरलं आहे. शपथ तर तसं कांहींएक नाहीं बरं. काय तुह्मांला सांगूं ? युद्धाचा प्रसंग मेला फारच वाईट हो ! आणि त्यांतून राज्याचा सगळा भार तुमच्यावर. हिंदुपदपातशाही सगळी तुमच्या जिवावर खुशाल आहे बरं भावोजी. आणि असं काय भलतंच मनांत आणतां ? कोणीं ज्याण्यानं चाडबुचकेपणा करून पुण्य पदरीं बांधूनं घेतलन् त्या मेल्याचं निसंतान होवो ! !

**भाऊ**—वईनी, तें असो एकीकडे. तुह्मां ऐकलेंतना मी काय नानासाहेबांपाशीं बोललों तें. "मृत्यु स्वदेशीं परदेशीं सुटत नाहीं; अथवा मेलें तर कोणी वाळवून ठेवणार नाहीं." आणि हेंच उत्तर तुह्मांला.

**गो०**—पण नव्हे भावोजी, असं करणं कांहीं चांगलं नव्हे बरं. हीं मर्मभेदी भाषणं नकोत मला ऐकायाला. आणि नाहींच तुह्मांला मी जाऊं द्यावयाची, आणि इतकं असूनही तुह्मांला जायाचं असलं तर अगोदर आमचं देहसार्थक करा आणि मग जा हवं तिकडे!

**भाऊ**—वईनी, हें काय असें भलतेंच बोलणें. तुह्मी आणि नानासाहेब शाबूत असाल तर आमच्यासारखे शेंकडों कारभारी मिळतील. तुह्मीं हजार गोष्टी सांगितल्या तरी मला हिंदुस्थानांत हें गेलेंच पाहिजे. मला गिलची बुडविल्याशिवाय चैन पडणार नाहीं!

"भावोजी, नाहींच तर तुह्मी आमचं ऐकत" असें ह्मणून गोपिकाबाईनें आपल्या अंगावरील शालजोडी भाऊपुढें टाकिली आणि ह्मटलें "जाणंच तर आह्मांला ओलांडून खुशाल जा."

**भाऊ**—वईनी, हें काय? अखेर बायका त्या बायकाच एकूण. असें काय वेड्यासारखें करतां हें. तुह्मी अशा कारभारांत पडूं नये. संभाळा आपलीं घरांतलीं कामें. (असें पुष्कळ संतापानें बोलत बोलत भाऊ तडक निघून गेले.)

तो महिना फाल्गुनाचा. शिमग्याचा खेळ यथासांग पार पडला. नाच तमासे रंग वगैरे आटोपले. उदयगिरीच्या लढाईंत भाऊंस नुक्ताच पूर्ण जय मिळालेला. त्या जयोत्सवांत सर्व मराठेलष्कर दंग झालेलें. इतक्यांत शिंदेहोळकरांचें पत्र आलें कीं, आपली दुराणीनें फार नासाडी केली. तें ऐकून सर्व लष्कर चवताळलें. आधींच जयोत्सवाचें वारें शिरलेलें आणि त्यांत हें वर्तमान ऐकतांच त्यांस फार त्वेष आला. समरांगणांत पडल्या वेळीं दत्താजी शिंद्याचा शिरच्छेद लाथेनें तुडवून केला

हें वर्तमान कळलें. दिल्लीचा बादशहा आणि फुटकळ नबाब अनेक वेळां दांतीं तृण धरून मराठ्यांस शरण आलेल आणि आतां त्यांनीं असा कावा केला. ह्मणून मराठ्यांच्या झाडून सर्व लष्कराला भारी संताप आला, व त्यासरशी आपलीं मनगटें अनेकांनीं कडकड चाविलीं, व केव्हां एकदां त्या दुस्मानाच्या नरडीचा घोट घेऊं असें त्यांस होऊन गेलें. इतक्यांत भाऊंची हिंदुस्थानांत स्वतः जाण्याची वार्ता व त्याचप्रमाणें चाललेली तयारी सर्वांस कळतांच, महाराष्ट्र देशांतील शहाजोग व अपूर्व करामती शूरपठ्ठयांच्या अंगांतील शौर्यसागर उचंबळूं लागला, ईर्षेच्या लाटा अनावर झाल्या, संतापवडवाग्नि भडकत सुटला. त्या झटक्यासरशी दुराणी–गिलची–आडदांड टोळी सपशेल आडवी पडून कोणीकडल्या कोणीकडेच नाहींनपश्चात् व्हावयाची. पण विधिघटनेची अजब जादु निराळी. तिच्या पुढें कोणाचें काय चालणार आहे? असो. भाऊंनीं, हिंदुस्थानावर, डरक्या फोडीत चालून जाण्याची जय्यत तयारी चालविली. खासा मर्द, मातबर सरदार झाडून सारा बोलाविला. जारीनें कलमबंदी चालू ठेविली. मराठ्यांचा सैन्यसागर भरतीप्रमाणें भराभर वाढूं लागला. आपल्या देशाची आणि धन्याची अब्रू गेली, अप्रतिष्ठा झाली, ह्मणून फणफणत महाराष्ट्रभूंतले किती नाग बाहेर पडतात याचा अंदाज कळेना. दमाजी गायकवाड, तुकोजी शिंदे, इभ्राईमखान गाडदी, असली अनेक वेळां सरकारकामीं पडलेली सरदारमंडळी ईर्षेनें बाहेर पडली. इभ्राईमखान गाडदी खासा मर्द. इमानाचा पुरा धड. तो भाऊसाहेबांस ह्मणाला "सरकार, आपण गनीम. खाविंद, आपण लढाईतून दहा वेळ पळाल. दहा वेळ पुनः जमाल. तसा रिवाज आह्मां गाड्यांचा नाहीं. आह्मी केवळ पायउतारे. पळावयास पाय नाहींत. आणि गांठ तों गि-

गिलचियांशीं तेव्हां काय ती आज्ञा बोलावी." "तुह्मी गाडून उभे राहाल तेथें मीही उभा राहीन. अंतर पडणार नाहीं." असें ह्मणून भाऊसाहेबांनीं इब्राईमखानास बेलभंडारा उचलून दिला. सर्व तयारी झाली. लष्कर अफाट जमलें. बाहेर पडावयाला मुहूर्त चांगलासा जवळपास लौकर निघेना. ज्योतिष्यांनीं पुष्कळ गणितें केलीं. सुमुहूर्त कांहीं सांपडेना. भाऊसाहेब ईर्षेबाज, संतापानें फणफणलेले, त्यांचे बाहु फुरफुरत. त्यांच्या कंबरेस लटकणारी समशेर, ऑ—ऑ करीत शत्रुरुधिरप्राशनार्थ धापा टाकीत बसलेली. मराठ्यांच्या सैन्यांत पेटलेला त्वेषाग्नि अनावर होत चाललेला. तेव्हां शिवालिखिताचा मुहूर्त कायम करून कुच करण्याचा बेत नक्की ठरला.

इकडे भाऊसाहेब विलक्षण आग्रहाला पेटले आहेत, कांहीं सांगावयास गेलें तर ऐकत नाहींत, मर्मभेदी भाषणें करितात. बरोबर आपली बायको पार्वतीबाई इलाही नेण्याचा त्यांनीं बेत कायम केला. तेव्हां, न जाणों ते तिकडेच रमतील. इकडलें त्यांचें लक्ष कमी होईल. मनांत अनेक विकल्प उद्भवतील. इत्यादि विचार गोपिकाबाईचे आणि नानासाहेबांचे सुरू झाले. आणि भाऊंबरोबर पायगुंता ह्मणून विश्वासरावांना पाठविण्याचा त्यांचा एकांतीं निश्चय ठरला. भाऊंना ती मसलत पसंत पडली. त्यांनीं विश्वासरावांना बरोबर नेण्याचें आनंदानें कबूल केलें. भाऊंची हांव दिल्लीतख्त पालथें पाडून तेथें ब्राह्मपाच्छाई मिरवावयाची. विश्वासरावांस दिल्लीतख्तावर बसवायाचें. अशा प्रकारचे एक आणि दोन, अनेक बेत त्यांचे मनांत सारखे चालले होते ह्मणून काय सांगावयाचें आहे?

तेव्हां अशा अटोकाट तयारीचें हें आमचें मराठ्यांचें सैन्य, मोठ्या ईर्षेनें, अतिशय उत्सवानें आणि जयश्रीच्या पूर्ण आशेनें फरा-

रून दांत ओंठ चावीत, गिलची ठार बुडवूं, होता कीं नव्हता करून सुरेख सूड उगवूं, जयश्रीला वरून तोऱ्यानें आनंदांत गुंगत परत येऊं, अशा उमेदीनें छाती वर करीत कशाची परवा नाहीं, प्राण ह्मणजे कःपदार्थ, रणमृत्यु ह्मणजे प्राणप्रिय दोस्त, अशा प्रकारच्या समजुतीचा ठसा मुखचर्येवर स्पष्ट उमटलेला लोकांस दाखवीत चाललें.

ती वेळ पहांटेची. अंतरिक्षकलिका नुकती उमलत चालली होती. इतक्यांत धन्याला पाठीवर घेऊन शत्रूंची खोडकी मोडण्यासाठीं आतुर झालेले, केव्हां एकदांचें समरांगण गांठून, आपल्या मालकांच्या दुस्मनांचीं टाळकीं अशीं पायानें तुडवीत जाऊं ह्मणून दाखविण्यासाठींचं जणों काय खूर आपटीत चाललेल्या घोड्यांच्या टापटाप आवाज; संभाळा, हुषार रहा, मर्दाप्रमाणें शत्रूवर तुटून पडा, ह्मणून ईर्षा भरविण्यासाठीं वारंवार चाललेल्या त्या अश्वांच्या किंकाळ्या; पहिल्या धडाक्यासरशीं शत्रूस चिरडूं, त्याची काय इतकी पर्वा असें भासविणारा बेपर्वाईच्या हालत डुलत चालण्यानें होत असलेला—मत्त गजांच्या पाठीवरून लोंबणाऱ्या घंटांचा घण्‌घण् नाद; हटकून जयश्री आपणांस वरणार, भलते विचार मनांत आणूं नका, एक समशेर कीं दुसरा दुस्मन इकडेच सारें लक्ष ठेवा ह्मणून वारंवार सुचविण्यासाठीं व अंगांतील शौर्यमद जास्त प्रदीप्त व्हावा ह्मणून सुरू ठेवलेला रणवाद्यांचा गजर, पुण्यप्रताप, शौर्य इत्यादिकांचें आगमन सर्व दुनयेस कळण्यासाठीं कंठशोष करणारा रणवाद्यांतील रणभेरीचा नाद; इत्यादिकांच्या गर्दीमुळें नभोमंडळांतील तारागण दचकून त्या वेळीं सैरावैरा लपण्यासाठीं पळत सुटला ! हा काय हलकल्होळ आहे ? हे कोण ? यांचें कोणीकडे कुच चाललें हें कांहींच न कळल्यामुळें गांगरूनच कीं काय भगवान् सूर्यनारायणासारखा

परम देदीप्यमान तारा लगबगीनें क्षितिजापासून वर धांवत येऊन लाल तृप्त मुद्रेनें पाहूं लागला! ही अशी चाललेली धांदल आपण तशीच सोडून जरा बाजूला उभे राहूं. आणि हें सैन्य पाहून आपल्या मनाशीं कोणते विचार घुटमळतात ते जरा बारकाईनें पाहूं. कारण, त्या सैन्यासारखें ईर्षेनें दुस्मानावर चालून जाण्याचें आपणांत सामर्थ्य उरलें नाहीं; तसा वखत आतां आह्मांस मिळणें कठिण. एवढेंच नव्हे, तर तें चाललेलें सैन्य पाहून व केव्हां केव्हां ऐकूनही गाळण होण्यासारखी आमची सुधारणा झाली आहे. इतकी आमची ताकद वाढली! तेव्हां त्या फंदांत न पडतां काय सुचतील ते विचार प्रगट करून काम भागवावें हें बरें.

एकंदरींत कालाचा महिमा अतर्क्य खरा. ज्या आपल्या मायदेशांतून असलें सैन्य मार मार करीत कुर्ऱ्यानें आलें त्याच आपल्या देशांत शंभर वर्षें पुरीं भरतात न भरतात तोंच काय विलक्षण प्रकार घडला तो पहा. ह्या लहानशा कालांतरांत आमच्या सर्व चांगलेपणाचीं, शौर्याचीं, अभिमानाचीं, श्रीमंतीचीं, ऐश्वर्याचीं, अकलेचीं, शंभर वर्षें पुरीं भरलीं हेंच खरें. तेव्हां कशाला व्यर्थ त्याची आठवण काढावी? अस्तु.

वास्तविक पाहतां, लढाई ह्मणजे कोण कठिण प्रसंग! त्या प्रसंगांत सांपडलें कीं, आई बाप, बहीण भाऊ, बायकापोरें, इष्टमित्र इत्यादि या दुनयेंतल्या पायगुंत्याचीं माणसें पुनः भेटतील किंवा नाहीं याचीच मुळीं अगोदर शंका. आपण कांहीं कामाकरितां बाहेरगांवीं जावयास निघालों ह्मणजे खास सुरक्षित, पाहिजे तेव्हां परत येऊं अशी खात्री असली तरी सुद्धां, त्या वेळीं घरच्या मंडळीला कोण हुरहुर लागते व आपल्याला किती जड वाटतें. मग लढाईवर जाणें ह्मणजे मनाची कशी बरें स्थिति

होत असेल? कारण, लढाईवर जाणें ह्मणजे काळाच्या दाढेंत सांगून सवरून शिरणें. मरण केवढा भीतिदायक परमावधीचा प्रसंग! दुःखाचा पूर त्या मरणांतून सारखा वाहात असतो. आणि तें मरण तर लढाईवर जाणारांचें पाहरेकरी. तेव्हां आमच्या मायदेशांतली ही इतकी मंडळी हिंदुस्थानांत लढाईवर जावयास निघाली ह्मणजे काय! खुद्द त्यांच्या मनाची कशी अवस्था झाली असेल? त्यांच्या घरीं कोण आकांत उडाला असेल! याची मनांत कल्पनासुद्धां आतांच्या शांततामय शिळपट काळांत यावयाची नाहीं. "न हि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्."

"देवा, आपलें मूल, आपला कलिजा, आपलें आंतडें, आपला प्राण, तो लढाईवर चालला! देश तर इतक्या लांब पल्ल्याचा. कोण वखत कसा येईल याचा काय नेम! पुनः गांठी पडतील काय! कुशलक्षेमाची वार्ता कोण कसा सांगेल! न जाणों, कदाचित् आपल्या पोराला गोळी लागेल! समशेरीचा घाव बसेल! त्यानें तो विव्हळ होईल. त्याचे प्राण कासावीस होऊं लागतील! पडल्या जागेवरून त्याला उठतां यावयाचें नाहीं! त्याची वास्तपुस्त करण्याचें कोणास भान राहील न राहील! तहान लागेल; भुकेनें प्राण तळमळेल; त्याला घोंटभर पाणी किंवा घांसभर अन्न हवें लागलें तर देणार कोण आहे! आई आई ह्मणत कण्हेल तेव्हां त्याच्या पाठीवर हात फिरवावयाला कसा आपल्याला मिळणार! त्याची ती गांगरलेली मुद्रा पाहून कोण कळवळणार आणि त्याला दम येई असें कोण बोलणार? कोणाला कशी फुरसत मिळेल! काय करूं! पुरुष झालें असतें तर बरोबर तरी गेलें असतें." हे उद्गार ह्मातार्‍या आईचे. त्याचप्रमाणें "आपला पोशिंदा, आपला प्राणपति, आपला प्राणेश, आपला सौभाग्यदाता, आपणास मागें एकटीला टाकून लढाईवर चालता झाला!

दुस्मानाशीं गांठ. किती गोळ्या लागतील ! किती घाव बसतील ! किती जखमा होतील आणि काय कहर कोसळेल." याची एकसारखी रात्रंदिवस हुरहुर लागलेली. त्या हुरहुरीस आर्द्रता येऊन डोळे पाझरूं लागावयाचे ही स्थिति बायकोची. अशा प्रकारें कोणाकोणाची स्थिति कशीकशी झाली असेल याचें वर्णन कोठवर करावें ? आणखी त्यांतून मनांत भीतीचे चरके व विरहाचे तडाके एकसारखे सुरू, पण त्याबद्दल तोंडांतून ब्र काढतां कामा नये. कारण, लढाईवर जाणें शुभ कार्य. हिम्मत खचेल, असे अपशकुन न व्हावे, ह्मणून आकंठ भरलेलें दुःख वारंवार गिळण्याचा प्रसंग घरच्यांस निमूटपणें सोसावा लागला असेल. तसाच कांहींसा प्रकार या लेखकास थोडा वेळ पतकरावा लागत आहे, इलाज नाहीं तेव्हां सुकाणूं थोडेंसें दुसरीकडेच वळविलें पाहिजे.

आईची ममता, बायकोचें प्रेम, मुलाबाळांचा लळा, आप्तइष्टांचा मोह इत्यादि चट साऱ्या दुर्भेद्य शृंखला तटातट तोडीत लढाईवर—क्लेशसमूहावर—साक्षात् मृत्यूवर चालून जावयाचें हा काय लहानसान पराक्रम ? हें काय अल्पस्वल्प धैर्य ? ही काय यःकश्चित् कर्तव्यदक्षता ? खरोखर धन्य त्या शिपाई गड्यांची ! याखेरीज अन्य उद्गार काढण्याला सुचतच नाहीं ! लढाईतलें मरण हटकून मुक्ति देणारें ही समजूत अगदीं सत्य होय ! ज्याचें अन्न खाल्लें, ज्या देशांत जन्मलों, तेथल्या लोकांच्या मानापमानाचा, संपत्तीचा आणि प्राणाचा अब्रूनिशीं बचाव करावा या पवित्र अतिश्रेष्ठ इच्छेच्या पायीं आपल्या स्वतःच्या प्राणाची, या दुनयेंतल्या तमाम आनंदाची व सुखाची आहुति अति आनंदानें देण्यास तयार होणारा शिपाई मर्द जवान, रणधुरंधर वीर पठ्ठा खचीत खचीत ! तो मोठा उपकारकर्ता; असामान्य योग्यतेचा थोर पुरुष; साऱ्यांचें भूषण; दुनयेचा खरा अलंकार आणि मातृभूमीचें

खरें सौभाग्य ! अशा सत्पुत्रांना प्रसवून आपल्या यशःकीर्तीचा ध्वज आर्यभूनें अक्षयी फडकावीत ठेविला, यांत कांहीं संशय नाहीं; पण नशीब तिचें खडतर, किंवा वेळच तिला खोटी लागली म्हणून त्याच रत्नगर्भा आर्यभूच्या पोटीं नादान कारटीं निपजून तीं तिच्या कपाळकरंटेपणाचा सारखा डंका वडवीत दुर्दैवाचा "भगवा झेंडा" अचरटासारखा दशदिशा मिरवीत सुटलीं आहेत. आपला आर्यदेश जन्मभू. तिची संपत्ति आडदांड गिलच्यांनीं यथेच्छ लुबाडली; तेथील लोकांचा बेसुमार छळ केला; त्यांची अब्रू, त्यांचा मान, त्यांचा लौकिक पायांखालीं तुडविला; त्यांचा विमलकीर्तिध्वज उपटून फेंकला; त्यांच्या तोंडाला काळोखी लाविली; त्यांच्या हक्कांची पायमल्ली करून सोडिली हें ऐकतांच या आपल्या महाराष्ट्रभूचें "पयःपान" केलेल्या नरश्रेष्ठ जवानमर्दांच्या अंगाची लाही लाही होऊन गेली आणि त्या तिडकेसरशी आईबाप, बायकापोरें, शेजारीपाजारी, आप्तइष्ट इत्यादि स्वप्राणप्रिय स्वजनांच्या हृदयांत भीति, शोक, काळजी, हुरहुर, स्वतः आपण होऊन लावून द्यावयाची आणि स्वतःचें शिरकमळ हातावर घेऊन बिनदिक्कत पार तडक चालतें व्हावयाचें; या त्यांच्या मनाच्या थोरपणाची, अभिमानाची, अब्रूच्या चाहाडीची आणि तेजस्वीपणाची तारीफ कितीही केली तरी ती सर्वस्वी अपुरीच होणार! देशाची इभ्रत, देशाची संपत्ति, देशाचा लौकिक, देशाचें कल्याण इत्यादिकांपुढें, प्रत्यक्ष स्वतःचे प्राण, आपल्या कुटुंबाचा घात, आईबापांस पुत्रशोकासारखा जबरदस्त धक्का, धर्मपत्नीस वैधव्यासारखी जबरदस्त नरकयातना, पोराबाळांस निराश्रित करण्याचें पाप इत्यादि केवळ तुच्छ, अगदीं भिकार वाटे ! तेव्हां अशा पुरुषांस उपमा कोणती द्यावी किंवा त्यांच्याशीं—आपली सध्याच्या स्थितींतली—बरोबरी करूं लागल्यास स्वतःच्या मानेची कशी स्थिति होईल याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा.

तेव्हां आतां आपण सध्यां एवढेंच करूं कीं "ईश्वरा, अशा या खऱ्या देशभक्त शूरवीरांच्या इच्छा पूर्ण कर, त्यांना सद्गति दे, त्यांस कांहीं उणें पडूं देऊं नको, त्यांच्या इच्छा व त्यांची हिम्मत यांच्या मानानें त्यांस ह्या नश्वर निदान चिरंतन लोकीं तरी अक्षय्य सुख दे." अशी प्रार्थना जगन्नियंत्याकडे भाकूं! आणि इतका वेळ डोळ्यांपुढें दिसणाऱ्या मराठ्यांच्या सैन्यास येथें असेंच सोडून दुसरीकडे आणखी कोठें काय दिसतें तें पाहूं. तोंवर मायामोह वगैरेंच्या सपाट्यांतून निघालेल्या या मराठ्यांचे मर्मभेदी व शोकाकुल विचारतरंग ईर्षेच्या आणि त्वेषाच्या कचाटींत सांपडोत. ते देशाच्या कल्याणाखातर व निमकहलालीसाठीं स्वतःच्या देहाची प्राणाहुति देण्यास तयार झाले आहेत तर ती प्राणाहुति त्यांस अक्षय्य कीर्तिमंदिरावर चढविण्यास कारणीभूत होवो, असें पुनः पुनः इच्छूं. तोंवर हें सैन्य हिंदुस्थानांत जाऊन धडकेलच.

---

## प्रकरण २ रें.

आमच्या महाराष्ट्र देशांतले शूर वाघ, डरक्या फोडीत मोठ्या त्वेषानें हिंदुस्थानावर चालून गेले; ही हकीकत मागील प्रकरणांत सांगितली. पण इतका त्वेष येण्याजोगें हिंदुस्थानांत काय घडलें, आपल्या देशाची, आपल्या मरातबाची, आपल्या अब्रूची इज्जत गेली असें त्यांना कां व कशावरून वाटलें; आणि प्राणासारखा परमप्यार पदार्थ केवळ कस्पट समजून ते जिवावर असे कसे उदार झाले? साक्षात् देवासारखीं इहलोकींचीं पूज्य दैवतें आईबाप; आपल्या आत्म्याचा, प्राणाचा, प्रत्यक्ष अंश अशीं मुलेंबाळें; आपल्या स्वतःच्या अंगाचा अर्धा भाग आणि प्राणाची लाडकी, सुखदुःखाची वांटेकरी सहचारिणी, धर्मपत्नी व इतर आप्तसुद्धां; अशांस केवळ स्मरणमात्रेंकरून अंगावर रोमांच

उठविणाऱ्या दुःखसागरांत लोटण्याइतकें निष्ठुर व उदास होण्याजोगा त्यांजवर असा वखत तरी कोणता आला होता? अशी अनेकांस शंका उद्भवेल. ह्मणून, जयोत्सवाच्या लालसेनें प्रत्यक्ष मृत्यूवर चालून जाणाऱ्या सैन्यास वाटेंतच सोडून दुसरीकडे नेण्याचा घांट घातला व त्याप्रमाणें तयारीसही लागलों. **मल्हारराव होळकर** व **जनकोजी शिंदे** यांचीं एकांतांत काय भाषणें चाललीं आहेत तीं याउप्पर ऐकावयाचीं. पण तेथें जाऊन पोंचे तोंपर्यंत दरम्यानची हकीकत सहज ध्यानांत राही अशी सांगितली असतां कंटाळवाणी व्हावयाची नाहीं. व त्यामुळें मार्गक्रमण करण्यांत उत्सुकता व हुरूपही बराच टिकेल ह्मणून तसें प्रथमतः करूं.

हिंदुपदपातशाही उठवावयाची अशी लालसा उत्पन्न झाली; तेव्हां त्या प्रकारचा प्रयत्न केला पाहिजे, तो कसा करावा हें **श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनीं** स्वतःच्या उदाहरणावरून दाखविलें आणि स्वराज्याचा भक्कम पाया घातला मात्र, तों लगेच इतर मंडळी हां हां ह्मणतां पुढें होऊन तिनें त्या पायावर साऱ्या दुनयेस हटकून थक्क करील अशी सुंदर व भव्य इमारत तात्काळ पांचपन्नास वर्षांत उभी केली! आणि या महाराष्ट्र देशांतल्या अनेक गुणशालिनी शौर्यसंपन्न व राजकार्यधुरंधर अशा मंडळीपुढें शेंकडों वर्षें बादशाही इभ्रत व सार्वभौमराज्य भोगलेल्या पिढीजाद कडव्यांस त्यांनीं कसें त्राहि त्राहि करून सोडिलें हें इतिहासाकडे थोडें फिरून पाहिलें ह्मणजे सुरेख कळेल! महाराष्ट्रदेश इतर प्रांतांच्या मानानें कमी सुपीक, तेथील लोक अंगानें धिप्पाड नव्हेत, बांधा खिरटा, आकार ठेंगणा, पण त्यांची हिम्मत मोठी अचाट, साहस किती विलक्षण आणि अक्कल कसली बडी! पदरीं अठरा विश्वे दरिद्र, पोटभर अन्नाची भ्रांत,

मानेवर नक्कल यवनी राज्याचें जखड जूं, इकडे तिकडे हूं कां चूं करीन ह्मटलें तरी सामर्थ्य नाहीं, दम निघत नव्हता; अशी लोकांची स्थिति. पण आपल्या मायदेशांत घोरत पडलेलें शौर्य व राज्यकारण एकाएकीं खाडकन् जागें झालें. त्या योगानें त्यांनीं सर्व देशभर, भरतखंडभर आपला दरारा सारखा बसविला. औरंगजेबासारख्या इमाम दांडग्या कपटपटुत्व राज्यकारणकुशल बादशहाच्या कारकीर्दींत संपत्तीच्या, अधिकाराच्या, शौर्याच्या आणि अखेर जुलमाच्या शिखरास जाऊन पोंचलेली दिल्लीपतीची मुरब्बी बादशाहत, आमच्या मायदेशाच्या "पयःपानानें" धष्टपुष्ट झालेल्या लेंकरांनीं, पहिल्या झटक्यासरशी जमीनदोस्त करून सोडिली; आणि दिल्लीपति ह्मणजे महाराष्ट्रीयांच्या हातचें बाहुलें असें सर्वांस ह्मणावयाला लाविलें. दिल्लीपतींस–अकबर, बाबर, औरंगजेब यांच्या वंशजांस मराठ्यांच्या आज्ञेखेरीज घोंटभर पाणी किंवा घांसभर अन्न खातां येईनासें झालें. असो.

भाऊ–सदाशिवरावभाऊ–आणि नाना पुण्यास पंतप्रधानकी गाजवीत असतां दिल्लीस दुसरा अलमगीर बादशाहा–नांवाचा, पोकळ सत्ताधारी–होता. त्याची स्त्री मलकाजमानी, व कन्या चंदाजमानी. मराठ्यांच्या कैदेंत आपण शिलिमगड किल्ल्यांत राहतों, त्यांच्या हुकुमाखेरीज आपणांस कांहीं जास्त खातां पितां सुद्धां येत नाहीं; आपण दिल्लीपतीच्या घराण्यांतलीं माणसें, आपल्या हातीं समग्र भरतखंडाचें राज्य कांहीं काळापूर्वीं होतें; आपली सत्ता आसेतुहिमाचल चालत होती आणि आतांच या मराठ्यांच्या–आपल्या जनानखान्यांत वाढलेल्या केवळ बंद्या गुलामांच्या–कैदेंत राहण्याचा आपणांस प्रसंग आला! आपणांस शिलेदारी सांगा, सुभेदार करा, अमुक द्या, तमुक सोडा ह्मणून दांत विचकणाऱ्यांच्या नातवांनींच आपणांवर स्वामित्व गाजवावें,

आपणांस कैद करावें ! हे विचार त्या दोघींच्या मनांत रात्रंदिवस घोळूं लागले. त्यामुळें त्यांस चैन पडेना. आणि पडणार तरी कसें? जे आपले गुलाम, बंदे ताबेदार ह्मणून पुढें फिरत त्यांनीं आपणांस बंदीवान ताबेदार करावें हें दुःख कल्पनेला देखील मोठें असह्य होतें, मग तें तर त्यांस चांगलें अनुभवास आलेलें! अलमगीरचा भाऊ गाजुउद्दीखान. त्याच्याकडे कुलवजीरी दिल्ली-पतीची असे. अर्थात् बादशहाप्रमाणें तीही पोकळ. या नाम-धारी कुलवजीराच्या पदरीं रोहिला नजीबखान ह्मणून प्यादा असे. यजमान नामधारी वजीर; त्यांचे मालक बादशहा नाटकांतल्या सारखे, पोकळ नांवाचे. तेव्हां नजीबखान रोहि-ल्याचे अंगीं थोडेंबहुत असलेलें कर्तृत्व जोरानें फांकूं लागलें. होतां होतां वजीरजीचे नजीबखान कुलकारभारी झाले. असा हा थाट दिल्लीचा. "मी अहमदशहा याची बादशहाजादी; अटकेअलीकडील मुलूख देखील दक्षिणदेश समुद्रवलयांकित पृथ्वीचें स्वामित्व केलें असें असतां मी अन्नाच्छादनास अजित्! (महाग) हें दुःख कोणास सांगावें? अलमशहा बादशाहा आह्मांहून बंदिवान; त्याचा वजीर गाजुद्दीखान गनीमाचा पुत्र. ओंजळीनें पाणी पिणारा; अष्टाधिकारी केवळ निर्माल्यवत्" तेव्हां कोणापाशीं आपलें दुःख सांगावें आणि तें कोण दूर क-रील अशी मलकाजमानीला काळजी प्राप्त झाली. नजीबखान रोहिला काबील मनुष्य वाटून तो कदाचित् आपणांस संकटांतून पार पाडील अशी तिला आशा उत्पन्न झाली. तो गाजुद्दीचा कारभारी ह्मणून अगोदर "आपल्या पोटापाण्याची बहुत तसदी आहे" असा निरोप तिनें मुख्य वजीराकडे पाठविला. त्याला वजीरसाहेबांनीं उत्तर केलें "मी काय नांवाचा वजीर. गनीमा-कडील अंताजी माणकेश्वर यांस पुसावें" तेव्हां त्या दिल्लीप-

तीच्या पट्टराणीनें अंताजी माणकेश्वर मराठ्यांचा दिल्लीकडील सरदार व कामदार यांजकडे आपला मनुष्य, तोच निरोप सांगून रवाना केला. त्यांनीं वजीरसाहेबांकडे बोट दाखविलें. पहा काळाचा चमत्कार कसा तो! दिल्लीपतीच्या खासजनान्यांत, पोटापाण्याची भ्रांत पडे इतकी आपली मराठ्यांनीं सत्ता वाढविली! नजीबखानास **मलकाजमानीनें** आपणांसमोर बोलावून आणिलें. त्याला आपली हकीकत सांगतांना तिचा कंठ भरून आला. तें दुःख तिला आवरेना. तिनें नजीबखानास अगदीं करुणस्वरानें ह्मटलें "कुलपातशाही बुडाली त्यामुळें बादशाही उमराव गनीमांस ( मराठ्यांस ) मिळोन आपली अब्रू राखून आहेत. बामणी बादशाही झाली. तूं रोहिल्याचे कुळांतील असलास तर बादशाहीस अवसान घालशील. असें निर्माल्यवत् राहणें उचित नव्हे. दुसऱ्यास आपले हातून बादशाही द्यावी." त्याला नजीबखानानें उत्तर केलें "तमाम बादशाही उमराव व रजवाडे अगदीं गनीमाचे आज्ञेत. बळ कोणाचे भिस्तीवर बांधावें? बादशहा बंदीवान. आह्मी ज्याचे पदरीं तो केवळ गनीमाचे ठेवणाईत." तथापि मी जें करीन त्याप्रमाणें वर्तण्याची आणभाक द्याल तर कंबर बांधतों. **मलकाजमानीनें** तें नजीबखानाचें बोलणें कबूल केलें; साजकरोटीची आणभाक दिली. पुढें नजीबखानाचें कारस्थान चाललें.

काबुल कंदाहारचा बादशहा अबदुलशहा दुराणी भारी जवान आणि खासा मर्द. हिंदुस्थान काबीज करावें ही त्याची बहुत दिवसांची हिम्मत. त्याच्याशीं या नजीबखान रोहिल्यानें संधान बांधिलें. त्याच्याकडे वकील पाठवून बोलणें लाविलें कीं, तुह्मीं हिंदुस्थानावर चालून यावें. मी पक्का भेद सर्व जाणतों. फितुरी तयार ठेविली आहे. दिल्लीचा बादशहा यास लंबा करा. त्याच्या

जागीं तुमचा मुलगा तैमुरशहा याला तक्तावर बसवा. वजिरी सुजाउद्दवल्यास सांगा. मला सेनापति करा. मलकाजमानीची खुपसुरत मुलगी चंदाजमानी ही आपली सून होण्याला तयार आहे. अवकाश करूं नका. ही मसलत अहमदशहा दुराणीस मान्य झाली. हें कशाला निराळें सांगावयाला हवें? परंतु अक्कल नजीबखानाची बडी कीं, ह्या गोष्टीचें कोणास स्वप्नही पडूं दिलें नाहीं; जिकडे तिकडे अगदीं सामसूम.

हा नजीबखान रोहिला ह्मणजे मनुष्याचा नीचपणा कोठवर जाणें शक्य आहे हें दाखविण्याकरितां खुद्द ब्रह्मदेवानें स्वहस्तानें ओतून तयार केलेला मूर्तिमंत पुतळा ह्मणावयास हरकत नाहीं! साजकरोटीसारखी आणभाक, स्नेह संपादून जो देईल त्याचाच घात करायाचा, तुमचा मी धर्मपुत्र ह्मणून पायां पडत जाऊन मरण टाळावयाचें आणि लगेच त्या धर्मबापाच्या नरडीचा घोंट घेण्याकरितां प्रयत्न करावयाचा; ज्याच्या पदरीं अन्न खाल्लें त्यास ठार मारावयाचें आणि तेंही कां तर आपली बोलबाला व्हावी ह्मणून इत्यादि एक का दोन या नजीबखान रोहिल्याचीं कृष्ण—कृष्णतर—कृत्यें सांगावयाचीं आहेत? नजीबखानानें अबदालीशीं बांधलेलें संधान खुद्द आपल्या धन्यास किंवा त्या धन्याच्या मालकास सुद्धां कळविलें नाहीं. एवढेंच नव्हे, तर, अबदाली आला, पुण्यास पत्रें लिहा, कुमक मागवा, असें बादशहाचें व त्याच्या वजीराचें सांगणें तर त्याला या मात्रागमन्यानें ह्मणावें कशाला? मराठ्यांचें नांव ऐकूनच अबदाली पळेल. मी जातीनें त्याचा फन्ना उडवितों. निदान सामदाम तरी चुकूं देत नाहीं, तुह्मी स्वस्थ रहा. अशा थापांखालीं कांहीं दिवस काढून मग ही स्वारी अबदालीच्या पारिपत्यासाठीं ह्मणून पुढें गेली आणि तेथून पत्रें लिहिलीं कीं, स्वस्थ रहा; अबदालीचा समाचार मी घेतों. मग

एकाएकीं रातोरात दिल्लीवर अबदालीसह येऊन त्यानें कत्तल सुरू केली. त्या वेळीं चौदा लाख माणसें मारलीं ह्मणतात. नजीबखानाचा अबदालीस गुरुमंत्र कीं, वजीरास ठार मारा, बादशहास कैद करा आणि तैमुरास ( अबदालीच्या मुलास ) गादीवर बसवा. पण तें दुराणीनें मान्य केलें नाहीं. तो नजीबखानासारखा उलट्या काळजाचा नव्हता. त्याला नजीबखानाच्या नीचपणाचा वीट आला. तुझ्या सारख्याच्या भरंवशावर मुलाला ठेऊन मी स्वदेशीं जात नाहीं, असें बोलून त्यानें नजीबखानाकडे दिल्ली सोंपविली, व लूट घेऊन तो अबदाली कंदहारास परत गेला. तेव्हां राघोबा भरारी व होळकर यांनीं दिल्लीवर मोर्चा फिरविला. नजीबखानास दे माय धरणी ठाय असें करून सोडिलें. तेव्हांचा तो निर्वाणींचा प्रसंग जाणून गुप्तरूपें नजीबखानानें मल्हाररावाशीं संधान बांधलें. मी तुमचा धर्मपुत्र. तुमच्याशीं बेइमान करणार नाहीं, ही साजकरोटीची भाक द्या, असा निरोप नजीबउद्दौल्याचा पाहून मल्हारराव होळकर कळवळला. त्यानें राघोबास भीड घालून नजीबखानाला जिवंत सोडविलें. पण निरुपायामुळें हा दुस्मन हातचा सुटला ह्मणून राघोबास कांहीं चैन पडेना. नजीबउद्दौल्याला रसातळास दडपण्याची कामगिरी शिंद्यास सांगून राघोबा दक्षिणेंत आले.

पण मराठ्यांचें नशीब खडतर. त्यांना चोहोंकडून फजीत करावयाचें ईश्वराचे मनांत. तेव्हां शिंद्यालाही नजीबखान भला माणूस वाटूं लागला. गोविंदपंत बुंदेल्याचे मार्फत, नजीबखान रोहिल्यानें, शिंद्याशीं धर्मबंधूचें नातें जुळविण्याचा व आणभाक देण्याघेण्याचा क्रम चालविला. तो सिद्धीसही पण गेला. भागीरथीचा पूल बांधून देण्याचा करार नजीबउद्दौल्याकडून करून घ्यावा. सुजाउद्दौल्यास मातीला मिळवावें आणि नजीबखानाचा

मग समाचार पाहूं हा शिंद्यांचा मानस. नजीबखानाच्या मनांत काय कीं, पुलाच्या नादानें यांस सुजाउद्दौल्याशीं झुंजण्याकरितां इरेंत घालावें आणि मागून अबदालीस आणून भिडवावें ह्मणजे हिंदुस्थानांतल्या एकून एक मराठ्याचें निर्दालन होईल. पण हा नजीबखानाचा घांट दत्ताजी शिंद्याच्या कांहीं ध्यानांत येईना. इतरांच्या आला पण उपाय काय? भागीरथीचा पूल नजीबउद्दौल्याकडून बांधून घेतला कीं हिंदुस्थानांतलीं मुसलमानांचीं मुळें-पाळें खणून काढल्यासारखें होईल, ही शिंद्यांची इच्छा; पण शेवटीं डाव पडला नजीबउद्दौल्यासारखा. ह्मणून, दोन वेळां मराठे मोठ्या भयंकर वावटळींत सांपडले. दशदिशा धुंद होण्याजोगे ते प्रसंग. प्राण वांचण्याची आशा नाहीं. पण किती झालें तरी महाराष्ट्रभूसिंहिणीच्या दुधावर पोसलेली मंडळी, ती काय अशानें बधते?

नजीबखान रोहिल्याच्या नादीं लागून शिंदे उभयतां—दत्ताजी व निरुपायानें जनकोजी—सुजाउद्दौल्यावर चालून गेले. भागीरथी नदीमध्यें ऐन वेळीं पुलाचा बेत असाध्य असें रोहिल्यानें सांगितलें. नजीबखान, सुजाउद्दौला एक झाले. तें वर्तमान दत्ताजीस माहीत नाहीं. आंतून नजीबखानानें आपल्या भावाला कंदहाराकडे अमदशाहा अबदालीस आणावयाला पाठविलें. अबदाली, सुजाउद्दौला आणखी कांहीं खुर्दा मंडळी यांचा बेत, मराठे सुरेख पेंचांत सांपडले; यांस येथें ठार करावें. "दक्षिणेंत वर्तमान कळवावयास मनुष्य न राहणें" ही त्यांची प्रतिज्ञा. सुजाउद्दौल्यानें क्रोड रुपये खंडणीदाखल देतों असें दत्ताजीकडे नम्रपणाचें बोलणें लावून पडती बाजू आपणाकडे घेतली. दत्ताजीचे वडील राणोजी शिंदे. त्यांनीं सुजाउद्दौल्याच्या बापावर अनंत उपकार केलेले. तेव्हां सुजाउद्दौला मात्रागमनीपणा क-

रील हें संभवेल कसें? हा दम शिंद्यांचा. पण सुजाउद्दौल्याचा बेत, मित्रभावानें आपल्या सैन्यांत उभयतां शिंद्यांस आणून त्यांस दग्यानें लंबे करावें. पण तें कांहीं साधलें नाहीं. इतक्यांत दुराणी लाहोरास आला. तुह्मी असे अडकून काय बसलेत? सारें हिंदुस्थान सध्या फिरलें आहे. कोणाचा भरंवसा न धरणें. अशीं सांबाजी शिंद्या-कडून पत्रांवर पत्रें येऊं लागलीं. तेव्हां दत्ताजीचे डोळे उघडले! पण उपयोग काय? खंडणीचें सोंग खोटें; नजीबखानाचा धर्मबंधुपणा लटका; सुजाउद्दौल्याची घरोबा कुचकामी; असा एकदम त्यास अनुभव आला. सगळ्या अडचणी त्याच्या एकदम लक्षांत आल्या. अलीकडे भागीरथी; पलीकडे सुजाउद्दौला, नजीबखान हे चांडाळ, सैन्य जय्यत करून समरांगणास आतां या ह्मणून दंड ठोकीत उभे; आणि पलीकडून अबदालीची दौड आली, ही बातमी; अशा वेळीं होळकर दूर, पुणें लांब, दिवस अडचणीचे, असा चोहोंकडूनच आकांत कोसळला. पण दत्ताजी शिंदे मराठा वीर. छाती त्याची सिंहासारखी. तो अशानें डगमगणार आहे थोडाच. चौहोंकडून असें आकाश कोसळलें हें पाहून त्याला चेव जास्तच आला. या निमकहराम नजीबखानाची व सुजाउद्दौल्याची गर्दन उडवीन ही हिंमत दत्ताजीची. जनकोजी दत्ताजीचा पुतण्या तोही मातबर वीर. त्याचाही दम चुलत्यापेक्षां कांकणभर जास्त. सुजाउद्दौला, नजीबखान, यांनीं भागीरथीचा पूल, क्रोड रुपयांची खंडणी, दोस्तीची मुलाखत वगैरे प्रकारची बतावणी केली ती सर्व दग्याची. आंतून लढाईची सुरेख तयारी ठेवून दीडलाख फौज गोळा करीत एकीकडून अबदाली व दुसरीकडून हे मात्रागमनी चालून येणार व मध्यें आपणांस कोंडणार. हा कावा कळतांच उभयतां शिंद्यांच्या तळव्याची आग मस्तकास गेली. कडाकड दांत ओठ चावीत नजीबखानाचीं व सुजाउद्दौल्याचीं

कृत्यें आठवून कसा आतां सुरेख सूड घेऊं या ईर्षेनें ते चढून गेले. इतक्यांत, लाहोराहून सांबाजी-शिंदे येऊन मिळाले. त्यांनीं अवदाली आला, त्यास चुकांडी देऊन आह्मी आलों, लढाईची तयारी ठेवा, विश्वासानें दगा झाला, असें दत्ताजीस कळविलें. तेव्हां, लगेच लढाईची तयारी करून समशेरी चमकावीत शिंदे बाहेर निघाले. तों अबदाली येऊन ठेपलाच. दारुण संग्राम सुरू झाला. त्या वेळीं मल्हारराव होळकर जयनगराला वेढा देऊन बसले होते. त्यांस निकडीचीं पत्रें गेलीं कीं, जयनगर टाकून रात्र ह्मणूं नका दिवस ह्मणूं नका, आह्मांस येऊन मिळा, तरच कांहीं घडगत व तुमचा आमचा पुनः भलेपणा. मल्हारराव, शिंद्यांस येऊन मिळणार तोंच दुराणी यांनीं शिंद्याच्या सैन्याची पुरी धूळधाण उडवून दिली. अग्रेसर जनकोजी शिंदे गोळी लागून घायाळ झाले. जनकोजी ठार झाले अशीच अवाई अगोदर लष्करांत एकदम पसरली. त्यासरशी दत्ताजी जास्त त्वेषानें तुटून पडले, लढतां लढतां फार जेरीस आले. पण कांहीं एक उपाय चालेना. दुराणी, नजीबखान, सुजाउद्दौला या सर्वांस, जागा सुरक्षित सांपडून त्यांची तयारी जय्यत व पूर्वीपासून सुरेख योजना केलेली. शिंदे, भरंवशावर बेसावध. मल्हारराव येऊन मिळतील तोंवर कशी तरी वेळ ढकलावी आणि मग एकच "हरहर" उठवून गिलच्या, नजीबखान आणि सुजाउद्दौला यांस कापून काढावें, हें धोरण दत्ताजीबुवांचें. पण तें सर्व आयत्या वेळीं चुकलें. होळकरांस येण्याला अवकाश; तोंवर दम निघेना. हरयत्न करून पाहिले. इतक्यांत दुर्दैवानें दत्ताजीसच गोळी लागली. ते घायाळ होऊन पडले. हें वर्तमान कुतुबशहानामक सुजाउद्दौल्याच्या गुरूस ( काजीस ) कळलें. कळलें कसलें, दत्ताजीला सुस्थळीं न्यावें ह्मणून, त्याच्या वि-

श्वासू खिजमतगारानें पूर्वींचा स्नेह जाणून त्यास कळविलें. कुतुबशहांनीं दत्ताजी शिंद्यास लत्ताप्रहार केला! कारण काय? तर "पटेल हमारे सात हौर लढेंगे" असा प्रश्न कुतुबशहानें केला. त्याला "बचेंगे तो हौर लढेंगे" असा मर्दानी जबाब शिंद्यांनीं केला. त्याचा त्वेष येऊन आपलें शौर्य दाखविण्यासाठीं लत्ताप्रहार, रणांगणांत घायाळ होऊन पडलेल्या दत्ताजीच्या मस्तकावर, आस्रा मागावयास खिजमतगार गेला असतां केला! काय हा मनुष्याचा नीचपणा! लाथेनें मारून कुतुबशहास धन्यता वाटली नाहीं. त्याचा शिरच्छेद करून तें डोकें अबदालीस नजर केलें! एवढें वर्तमान कळतांच मराठ्यांच्या सैन्यांत हूल पडली. जनकोजी शिंदे तों आधींच पडले आणि दत्ताजीची तर ही अवस्था. आतां कोणाच्या हिमतीवर लढावें? असा प्रसंग गुदरतांच पळ काढण्याखेरीज, धनी ना गोसावी झालेल्या मराठ्यांच्या सैन्यास दुसरा उपाय सुचेना! आणि सुचावा तरी कसा? मराठ्यांचें सैन्य पळत सुटलें ह्मणतांच कापाकापी गिलच्यांनीं सुरू केली. मराठ्यांचा एक मनुष्य मारून आणील त्याला पांच रुपये बक्षीस देण्याचें सुजाउद्दौल्यानें गिलच्यांस जाहीर केलें! शिर कापून न्यावें आणि त्याचे पांच रुपये मिळाले ह्मणजे मग त्या कापलेल्या शिराचें नजीबखान रोहिल्यानें नाक कापवावें व तें कापलेलें पाहून स्वतःस कृतार्थ मानावें. असा धडाका सुरू झाला. शिव शिव! मराठ्यांवर या वेळीं ईश्वर कोपला. त्यांचें अचाट साहस, विलक्षण धैर्य आणि निस्सीम व अनुपमेय स्वराज्यभक्ति याचें हें असें जगन्नियामकानें चीज करण्याचें मनांत आणिलें याला उपाय नाहीं!

असो. येणेंप्रमाणें शिंद्यांच्या सैन्याची अवस्था झाली. ज-

नकोजी शिंदे घायाळ होऊन रणांगणीं पडले. त्यांस त्यांच्या इमानी नौकरांनीं कसें तरी जिवंतपणें बाहेर आणलें. शिंद्यांचा कबीला व थोडें शेलकें लष्कर कसें तरी जीव राखून पळत सुटलें. तों वाटेंत मल्हारराव भेटले. त्यांस हें वर्तमान ऐकून व ती त्यांची स्थिति पाहून अतिशय वाईट वाटलें. पण करतात काय? "आलिया भोगासि असावें सादर" तशांतला प्रकार. दुराणीला हेलकावे देत मल्हाररावांनीं बरेंच खेळविलें. पण उपयोग कांहीं झाला नाहीं. तेव्हां, दक्षिणेंत पुण्यास पत्रें पाठवून कुमक मागवावी आणि गिलची ठार बुडवावा हा मनसुबा कायम केला. त्यामुळें भाऊ—**पानपतचा मोहरा** असें लष्कर घेऊन हिंदुस्थानावर चालला.

आतां जनकोजी आणि मल्हारराव एकांतांत बसले आहेत तेथें त्यांचें बोलणें काय चाललें हें पाहूं.

**मल्हारराव.** तूं ह्मणतोस कीं नाहीं जनकोजी, तेंच खरं पहा. पुण्यास नाहीं कोणी पोक्त मसलतीचा मातबर मनसुबेवाला. भाऊसाएबाकडे सगळा कारभार. तो तरणा ज्वानगडी. बळवंत गणपत सारखे त्याचे सल्लामसलतगार. ह्मणून मला फिकीर बहुत वाटते. शिरिमंताची पुण्याई असेल तंवर सगळ्या गोष्टी पार पडतील ह्मणा. पण आमच्या वकीलाच्या खबरा पाहिल्या ह्मणजे वाटतं कुठं हे सारी मसलत बुडवितात कीं ह्मणून. आन् त्यासाठीं तर हा जीव सारखा तडफडतोय.

**जनकोजी.** आहेत ते सारे थोर खाविंद. पण नवं वय सारं सभोंवती मिळालं. आन् भाऊसाएबास्नी वाटतं आपली सलाबत कांहीं कमती नाहीं. पण हीं सारीं मसलत बुडायचीं चिन्हं दिसतात. आपणाला तर दम निघत नाहीं.

**मल्हारराव.** काय होणार तें ईश्वरस्वाधीन ह्मणा. आपणाला

काय ? स्वामिसेवा कर्तव्य, असा दुस्मनांनीं आपणांवर गहजब उडवून दिला. त्यांची खोड मोडावी ही बहुत इच्छा, ह्मणून पुण्यास पत्रें धाडलीं. काय हिंदुस्थानांतून मराठ्यांस हे मोंगल हाकलून लावणार? थांबा तुह्मांलाच देशोधडीला लावून हिंदुपदपातशाहीचा चोहों राज्यांत डंका न मिरवूं तर आह्मी नांवाचे मराठे नहोंत. पण जनकोजी, पुण्याकडलीं लक्षणें कांहीं चांगलीं दिसत नाहींत. आमचें ऐकायचें नाहीं असें तर धोरण मला साफ दिसतें. हें असें भलतें सलतें करून हे सर्वांना खड्ड्यांत घालतील आणि या पांढऱ्या दाढीला काळोखी लावायाला ते कमी करायचे नाहींत. खासा स्वारी कांहीं येण्याचें कारण नव्हतें. मागें पुण्यास कोणी पाठपुरावा करणारा नाहीं मातबर. शिरिमंत नानासाहेब विलासी प्राणी. जनकोजी, वखत तर कठिण दिसतो. दत्ताजी बुवांनीं स्वर्गांतून इकडे सारखे डोळे लाविले असतील. अबदाली ठार बुडविल्याविणें त्यांचा नाहीं जीव थंडा व्हायचा. मला सुद्धां चैन कसें तें पडत नाहीं. केव्हां कापीन अबदाली असें होऊन गेलें आहे. नजीबखान रोहिला मोठा हरामखोर! त्या मात्रागमन्यास दावितों या होळकराची समशेर. अरे हरामखोर! एक दत्ताजी पाटील गेला ह्मणून काय सारी दुनया ओस पडली? त्याचा पुतण्या जनकोजी काय बांगड्या भरून बसला असें समजलांत होय?

जनकोजी—काका! आहेना याद? दत्ताजी काकाला कुतुबशहानें लाथेनें तुडविलें नि शिर कापून काय ह्मणे "अबदालीची बोलबाला" असें नजीबखान ओरडला! दत्ताजी शिंदे आणि त्यांचा शिरच्छेद लाथेनें मारून, हरामजाद्या कुतुबशहानें करायाचा! अरे नादान रंडक्यांचीं रे हीं कामें! थांबा सारा हिंदुस्थाननिहिंदुस्थान कापीन तरच जनकोजी नांवाचा; शिंद्याच्या कुळांत जन्मलेला.

नकोजी शिंदे घायाळ होऊन रणांगणीं पडले. त्यांस त्यांच्या इमानी नौकरांनीं कसें तरी जिवंतपणें बाहेर आणलें. शिंद्यांचा कबीला व थोडें शेलकें लष्कर कसें तरी जीव राखून पळत सुटलें. तों वाटेंत मल्हारराव भेटले. त्यांस हें वर्तमान ऐकून व ती त्यांची स्थिति पाहून अतिशय वाईट वाटलें. पण करतात काय? "आलिया भोगासि असावें सादर" तशांतला प्रकार. दुराणीला हेलकावे देत मल्हाररावांनीं बरेंच खेळविलें. पण उपयोग कांहीं झाला नाहीं. तेव्हां, दक्षिणेंत पुण्यास पत्रें पाठवून कुमक मागवावी आणि गिलची ठार बुडवावा हा मनसुबा कायम केला. त्यामुळें भाऊ—**पानपतचा मोहरा** असें लष्कर घेऊन हिंदुस्थानावर चालला.

आतां जनकोजी आणि मल्हारराव एकांतांत बसले आहेत तेथें त्यांचें बोलणें काय चाललें हें पाहूं.

**मल्हारराव.** तूं ह्मणतोस कीं नाहीं जनकोजी, तेंच खरं व्हा. पुण्यास नाहीं कोणी पोक्त मसलतीचा मातबर मनसुबेवाला. भाऊसाएबाकडे सगळा कारभार. तो तरणा ज्वानगडी. बळवंत गणपत सारखे त्याचे सल्लामसलतगार. ह्मणून मला फिकीर बहुत वाटते. शिरिमंताची पुण्याई असेल तंवर सगळ्या गोष्टी पार पडतील ह्मणा. पण आमच्या वकीलाच्या खबरा पाहिल्या ह्मणजे वाटतं कुठं हे सारी मसलत बुडवितात कीं ह्मणून. आन् त्यासाठीं तर हा जीव सारखा तडफडतोय.

**जनकोजी.** आहेत ते सारे थोर खाविंद. पण नवं वय सारं सभोंवती मिळालं. आन् भाऊसाएबास्नी वाटतं आपली सलाबत कांहीं कमती नाहीं. पण हीं सारीं मसलत बुडायचीं चिन्हं दिसतात. आपणाला तर दम निघत नाहीं.

**मल्हारराव.** काय होणार तें ईश्वरस्वाधीन ह्मणा. आपणाला

काय ? स्वामिसेवा कर्तव्य, असा दुश्मनांनीं आपणांवर गहजब उडवून दिला. त्यांची खोड मोडावी ही बहुत इच्छा, ह्मणून पुण्यास पत्रें धाडलीं. काय हिंदुस्थानांतून मराठ्यांस हे मोंगल हाकलून लावणार? थांबा तुह्मांलाच देशोधडीला लावून हिंदुपदपातशाहीचा चोहों राज्यांत डंका न मिरवूं तर आह्मी नांवाचे मराठे नव्होंत. पण जनकोजी, पुण्याकडलीं लक्षणें कांहीं चांगलीं दिसत नाहींत. आमचें ऐकायचें नाहीं असें तर धोरण मला साफ दिसतें. हें असें भलतें सलतें करून हे सर्वांना खड्ड्यांत घालतील आणि या पांढऱ्या दाढीला काळोखी लावायाला ते कमी करायचे नाहींत. खासा स्वारी कांहीं येण्याचें कारण नव्हतें. मागें पुण्यास कोणी पाठपुरावा करणारा नाहीं मातबर. शिरिमंत नानासाहेब विलासी प्राणी. जनकोजी, वखत तर कठिण दिसतो. दत्ताजी बुवांनीं स्वर्गांतून इकडे सारखे डोळे लाविले असतील. अबदाली ठार बुडविल्याविणें त्यांचा नाहीं जीव थंडा व्हायचा. मला सुद्धां चैन कसें तें पडत नाहीं. केव्हां कापीन अबदाली असें होऊन गेलें आहे. नजीबखान रोहिला मोठा हरामखोर! त्या मात्रागमन्यास दावितों या होळकराची समशेर. अरे हरामखोर! एक दत्ताजी पाटील गेला ह्मणून काय सारी दुनया ओस पडली? त्याचा पुतण्या जनकोजी काय बांगड्या भरून बसला असें समजलांत होय?

**जनकोजी**—काका! आहेना याद? दत्ताजी काकाला कुतुबशहानें लाथेनें तुडविलें नि शिर कापून काय ह्मणे "अबदालीची बोलबाला" असें नजीबखान ओरडला! दत्ताजी शिंदे आणि त्यांचा शिरच्छेद लाथेनें मारून, हरामजाद्या कुतुबशहानें करायाचा! अरे नादान रंडक्यांचीं रे हीं कामें! थांबा सारा हिंदुस्थाननिहिंदुस्थान कापीन तरच जनकोजी नांवाचा; शिंद्याच्या कुळांत जन्मलेला.

काका! कुतुबशाहा दोस्त, नजीबखान दोस्त, सुजाउद्दौला दोस्त आन् अखेर सारेच दुस्मान् बेइमान. बायके!

मल्हारराव—पण जनकोजी, राहूं द्या त्या गोष्टी. असूं मर्द तर घेऊं साऱ्यांचा सूड. पण ह्योरली मसलत कशी?

जनकोजी—पुढली मसलत काय? गिलच्या कापून काढला पाहिजे. दत्ताजी काकाचा शिरच्छेद ज्यांनीं लाथ मारून केला त्यांस या दुनयेंत जिवंत राहूं द्यायचें नाहीं. आणि हिंदुस्थानांतील एकूनएक मुसलमान मेंढरें करून सोडायचीं आणि हिंदुपदपादशाहीचा भगवा झेंडा नाचत न्यायाचा नि काय?

मल्हारराव—बरोबर आहे. या गोष्टी तर झाल्याच पाहिजेत, पण त्या घडवून कशा आणाव्यात? पुढें मसलत कशी करायची? भाऊसाहेबांचीं पत्रें पाहिलींतना? त्यांला काय जबाब द्यावा? भाऊसाहेब थोर खाविंद. यांनीं ठिकाणीं राहूनच फौजेचा पुरावा करायचा पण तसें कांहीं दिसत नाहीं. भाऊसाहेब निघोन आले. त्यांतच सर्व गोष्टी आटोपल्या.

जनकोजी—तसें तर खरेंच. भाऊसाहेबांची खासा स्वारी यायची नव्हती. पण आमचें कोण ऐकतो? आतां असें करूं "आह्मीं मजलदरमजल कुच करीत यावें किंवा दम खात यावें" असें भाऊसाहेबांनीं पत्रांत विचारलें. त्यांला नका येऊं असें लिहूं ह्मणजे झालें. कारण, आपल्याला कशी तरी एवढी मसलत पार पाडली पाहिजे. नजीबखानानें दगा दिला, विश्वासघात केला, नाना लटपटी मांडल्या. अहो, दत्ताजी काकांस मुलाखतीला बोलावून मारावयाचा घांट आणला, आपल्या फौजेची पाहिलीतना कशी धूळधाण दग्यानें उडवून दिली ती? अबदालीनें बैराग्यांची सुद्धां कत्तल केली. असें एक का दोन? आठवण झाली कीं अंगाची कशी लाही लाही होऊन जाते. ह्मणून ह्मणतों काका!

तुमचें आमचें सगळें मागलें विसरा आतां, आणि या गिलच्यांचीं आणि मुसलमानांचीं पाळें मुळें खणून काढण्याचा विचार बघा!

मल्हारराव—मागलें विसरायचें काय? कुंभेरीच्या वेळ्यापासून थोडें तुमचें आमचें बिनसलें, पण तो विचार खाजगी. त्याचा संबंध येथें काय? आणि तें उरलें आहे तरी कुठें. तें कांहींएक मनांत आणूं नका. खंडोबाची शपथ मी वाहतों पाहिजे तर, कीं, शिंदे आणि होळकर कांहीं दोन नाहींत. तुमचा पराभव झाला, दत्ताजीचा शिरच्छेद केला आणि कबिला, आमच्या शिंद्यांचीं बायकामुलें उघडीं नागडीं पळत सुटलीं, हें ऐकून काय सांगूं जनकोजी माझी अवस्था कशी झाली ती! शिंद्यांचा राणीवसा आणि त्यांना नेसलीं लुगडीं झाडास बांधून निवारा घेण्याचा प्रसंग या नीच अविंधांनीं आणावा आणि तो या मल्हाररावानें ऐकावा? काय आमचं जिणं हें! आणि—

जनकोजी—काका, नका त्या गोष्टीची आठवण काढूं; संतापानें शरीराचा भडका उडतो. आतां त्या साऱ्यांचें उटें काढून घेतलें ह्मणजे ज्या गोष्टी झाल्या, त्यांचें दुःख गेलें. आमच्या हातांत कांहीं कांकणें नाहींत, नंग्या समशेरी आहेत. आणि जातीनें पुरुष आहोंत. घेऊं या सर्वांचा सूड, तरच जन्मल्याचें सार्थक. पण काका, तुह्मी कसा सल्ला भाऊसाहेबांस कळविणार?

मल्हारराव—सल्ला कसला? मी तर साफ लिहणार कीं "आधींच न यावें. ज्यांनीं मनसबा दिला ते थोर आहेत. रोहिला, सुजाउद्दौला व दुराणी कांहीं सामान्य नाहींत. यास्तव मोहरा इरेस पाडावा असा अर्थ नाहीं. याजकरितां साहेबीं माळवे प्रांतीं राहून छावणी करावी. पुढें फौज मात्र सडी रवाना करावी. आह्मी साहेबांच्या दमावरी कार्य उरकून घेतों." तुमचें कसें काय ह्मणणें?

जनकोजी—हो, असेंच खरें. पण अशानें त्यांस राग येईल. किती झालें तरी ते आपले मायबाप धनी आहेत.

मल्हारराव—आन हिथं कोण नाहीं ह्मणतो? शिरिमंतांच्या पायामुळें तर तुह्मी काय आणि आह्मी काय वाढलों आहोंत. त्यांचें अन्न आजवर खालें आणि पुढेंही खाणार. सरकारसेवेशिवाय आपल्याला दुसरेंतिसरें कांहीं दिसत नाहीं. पण धन्यांनीं असें भलतेंच केलें तर काय करावें? आपला धर्म चाकराचा. चाकरी तर केली पाहिजे. असेल शिरिमंतांची पुण्याई तर होईल मनाजोगती फत्ते? शिरिमंत शाबूत तर आह्मी शाबूत. ह्मणून मी तर असें पत्र लिहणार. तुह्मीही तसेंच लिहा. तसें केल्याशिवाय चालायचें नाहीं.

जनकोजी—काका, कसेंही करून त्या अबदालीचा आणि नजीबखानाचा कांटा उपटून टाकिला पाहिजे. तसें करू तरच आपलें जिणें.

अशा प्रकारचीं शिंदेहोळकरांचीं बहुत भाषणें झालीं. आणि ठरल्याप्रमाणें भाऊसाहेबांकडे पत्रें रवाना केलीं. तीं पत्रें पाहून भाऊसाहेब क्षणमात्र चिंतामग्न झाले. पण त्यांचे सल्लागार दोस्त बळवंत गणपत महासमर्थ, बिचाऱ्याच्या बुद्धीला सरळपणा ह्मणून ठाऊकच नव्हता. त्यांनीं भाऊसाहेबांस सांगितलें "भाऊसाहेब, शिंदेहोळकर या राज्यांत बहुत दिवस कमून राजे झाले त्यांस आह्मी आलियाचें सुख काय आहे?" भाऊसाहेबांस हें बळवंत गणपतचें बोलणें अक्षरशः खरें वाटलें; हें अखिल महाराष्ट्रियांचेंच दुर्दैव ह्मणावयाचें! कारण अशा स्वामिनिष्ठ सेवकांविषयीं भलताच ग्रह बळवंत गणपतनें "स्वारी"चा केला. पण भाऊसाहेबांस किंवा त्यांच्या अक्कलवान मंत्री मेहेंदळ्यास एवढें कळलें नाहीं कीं, शिंदेहोळकरांची गिलच्यांनीं धूळधाण उडवून

दिली; अनेक तऱ्हेचा अगदीं जिव्हाळ्यास लागे असा साऱ्या दुनयेंत अपमान केला. स्वतः जनकोजीस अंगावर घाव घेऊन बायकांसारखें रडत पळावें लागलें! "मुलगी होतास तर घरीं जांवई तरी येता" असें बायकांनीं जनकोजीस वाक्ताडण केलें, दत्ताजीला दगा दिला, त्याचा निर्लज्जपणानें शिरच्छेद केला, इत्यादिकांचा सूड घेतल्याशिवाय राहण्याइतके त्यावेळचे नादान लोक नव्हते. मल्हारराव होळकर ह्मणजे काय कमी? पण गिलच्यांची दौड पाठीवर घेऊन पळतां पळतां बिचाऱ्याचा प्राण बेजारीस आला; आणि तो गिलच्यांचा सूड उगवावयाचा सोडून असा निर्लज्ज स्वार्थसाधुपणा करील हें बळवंतरावांसारख्यांस ह्मणूनच शक्य वाटलें. असो. अशा पत्रोपत्रीं वऱ्याच चकमकी उडून एकमेकांच्या मनांत यथेच्छ किल्मिष सांचत चाललें. मल्हाररावानें भीडमर्यादा सर्व बाजूला ठेवून भाऊसाहेबांची खूप कानउघाडणी केली. पण त्याचा उपयोग कांहींएक झाला नाहीं. मल्हाररावानें तळतळून पुष्कळ प्रकारें भाऊसाहेबांस विनवून पाहिलें. कांहीं उपयोग होईना. भाऊसाहेबांस आणि त्यांजबरोबर आलेल्या सैन्यास, ही गिलच्यावरची स्वारी ह्मणजे खेळ वाटला, इतकी त्यांस समरभूमीची बेपरवाई. कारण बरोबर बायकापोरें पुष्कळांनीं आणिलीं होतीं. खुद्द पेशवेसरकारची सून, भाऊसाहेबांची बायको, नाना फडणीसाची आई अशी मंडळी, ब्राह्मणस्त्रिया, युद्धार्थ लष्कर चाललें हें ठाऊक असून सैन्याबरोबर आल्या होत्या! महाराष्ट्रभूच्या त्या वेळच्या लेंकरांत आणि आतांच्या लेंकरांत केवढें अंतर; हें पाहून आतां पुष्कळांस फार विस्मय वाटेल! असो. हीं बरोबर बायकामुलें आहेत, बोजड सामानसुमान भारी, तेव्हां, त्यांस मागें चांगल्या बंदोबस्ताच्या ठिकाणीं ठेवून सडीस्वारी तुटून पडावयास जावी, हा तरी मन-

सुबा कायम करा असा मल्हाररावानें आग्रह धरिला. तें बोलणें मात्र भाऊसाहेबांनीं कबूल केलें. आग्र्याचा किल्ला बळकट. तेथील किल्लेदारानें बेइमानपणा करणार नाहीं ह्मणून मल्हाररावास आणभाक दिली होती. मुसलमानांचें आणि हिंदूंचें हें युद्ध अशी उठावणी करून रजपूत, जाट, शीख या लोकांस आपणांकडे घेण्याचा प्रयत्न शिंदेहोळकरांनीं चालविला. तसाच तिकडे नजीबखानानेंही सर्व मुसलमान फितवून गोळा करण्याचा क्रम आरंभून बरीच साध्यता संपादली. पण मराठ्यांचा मोहरा सदाशिवराव; त्याच्या मनांत हें धोरण उतरलें नाहीं. त्याला स्वतःच्या मर्दुमकीची, दुर्दैवानें, जी घमेंड वाटत असे ती कांहीं पुसून सोय नाहीं. मी केवळ आज साक्षात् परशुराम, एक वेळा निर्यवन भरतभू करणें ह्मणजे यःकश्चित् काम असें त्याला वाटे, आणि त्याचे कानमंत्रीही तसेच लटकेसटके प्रताप गात !

सुरजमल्लजाट रणांत खंबीर; धोरणाचा पक्का; इमानाचा धड; नीतीचा भक्त. त्याला मोठ्या मिनतवारीनें आपल्याकडे होळकरानें आणिलें. प्रथम भाऊही, त्याला सामोरे जाऊन, यथाविधि आदरसत्कार करून, घेऊन आले. पण मराठ्यांचें दैव धड नव्हतें; ह्मणून अशा राजाला दुखवून त्यास परत जाण्याची गोष्ट भाऊंच्या हातून घडली. भाऊंना पैशाची अडचण पडली. ती निभावण्याची युक्ति सुचेना. दिल्ली शहर मराठ्यांच्या पूर्ण स्वाधीन झालेलें. तेथले बादशहा वगैरे सर्व भाऊच. त्यांच्या मनांत त्या तखतावर विश्वासरावांना बसवावयाचा बेत होता, परंतु अशा आणीबाणीच्या वेळीं हें कृत्य ज्यास्त विकोपास जाईल ह्मणून सर्वांच्या आग्रहावरून त्यांनीं तो नाद सोडला. परंतु दिल्लीपदपातशाही पालथी घालून तिजवर हिंदुपदपातशाही, कांहीं दि-

वस कां होईना, आमच्या मराठ्यांनीं मिरविली. तें असो. पैशाची टंचाई भारी, काय करावें? अशा चिंतेंत भाऊसाहेब. तों त्यांस एक अजब युक्ति सुचली. दिल्लीच्या तखतावर चांदीचें छत आहे, तें पाडलें असतां टांकसाळींतून पुष्कळ रुपये पडतील, तेव्हां, तसें करावें, असा त्यांनीं निश्चय केला. पण सुरजमल्लाला ती मसलत पसंत पडली नाहीं. तो ह्मणाला आह्मी बादशाही उमराव. आमच्या देखत या गोष्टी होऊं नयेत. खर्चास नसतील तर मी पांच लाख देतों, पण छत तोडूं नये. न मागतां न विचारतां हा पांच लाख देतो. तेव्हां छतापासून जास्त रुपये निघालेच पाहिजेत, असा अर्थ करून भाऊसाहेबांनीं दिल्लीपतीचें तखत अखेर फोडलेंच ! त्या योगानें सुरजमल्लजाटाचें मन भारी खट्टू झालें. त्यानें भाऊसाहेबांच्या तोंडावर ह्मटलें "भाऊसाहेब, आह्मी जवळ असतां तुह्मीं तख्तविध्वंस केला. येणेंकरून आह्मांस दूषण. ज्या गोष्टींचा साहेबांस अर्ज करावा ते समयीं आपण अव्हेर करतां. आमचे चित्तांत हिंदुधर्म आहे. राज्य स्वस्थ राहावें. तुमचें आमचें इमान झालें. यमुनेचें पाणी हातांत घातलें त्याचें सार्थक हेंच कीं काय ?" परंतु मराठ्यांचें दुर्दैव ओढवलेलें. भाऊसाहेबांस सुरजमल्लजाट यःकश्चित् मनुष्य वाटे. तो त्यांच्या मनांत सुद्धां भरेना. मग त्याचें बोलणें कोठून मान्य व्हावयाचें ! त्याच्या ह्मणण्याचा धिःक्कार करणें हेंच पुण्यप्रतापाचें त्यांस मुख्य लक्षण वाटे. याशिवाय शिंदेहोळकर कदीमचे मातबर सरदार. हिंदुस्थानांत मराठ्यांचा भगवा झेंडा त्यांनीं यथेच्छ नाचविलेला. पेशव्यांच्या सत्तेचा भक्कम पाया त्याच बहादूर रणधुरंधरांनीं घातला ! पण भाऊसाहेब आणि त्यांचे शालक अगाधबुद्धि बळवंत गणपत यांना त्याचें काय ? अमृत, विष दिसावें अशी त्यांची दृष्टि, मदानें मंद झालेली. दुराण्याचा पेंच बसला तो अगोदर

शिंदेहोळकरांस, त्याचा सूड उगविण्याकरितां त्यांनीं आपल्या धन्यापाशीं दांत विचकले. तो सूड उगवावा ह्मणून भाऊसाहेब हिंदुस्थानांत आले; आणि त्यांनीं केलें काय? तर शिंदेहोळकरांसच तुच्छ मानिलें! शिंदेहोळकर दुस्मन् असें भासविण्याची पुण्याई गणपतपुत्र बळवंत यानें मिळविली. त्याचा सल्ला भाऊसाहेबांस खरा वाटे. शिंदेहोळकर निरढावलेले मातबर सरदार. त्यांना हिंदुस्थानचा खडान्खडा माहिती. घोरणें सर्व त्यांच्या आटोक्यांत आलेलीं. पण हें सर्व एकीकडे सारून, त्यांचें काडीभर न ऐकतां त्यांचा नुकसानीचा भाऊसाहेब सूड घेणार; काय बोलावयाचें आहे! शिंदेहोळकरांनीं सुरजमल्लास आणिलें. त्याचें मन दुखविलें ह्मणजे अर्थात् यांचें दुखविलें, एवढेंच नव्हे, तर, त्याजपेक्षां जास्त करामत, या पुण्यपुरुषानें केली. ग्याजुद्दिन दिल्लीचा वजीर. तो मराठ्यांचा पक्का व इमानी दोस्त. आपला मालक, दिल्लीचा बादशहा दुराण्याशीं खलवत करितो, असें पाहून ज्या ग्याजुद्दिनानें त्याला ठार केलें, आणि शिंद्यांस दग्यानें अडकविलें तेथें रातोरात आणि सडा जाऊन ज्यानें इषारा दिला, दुराणीची दौड पाठीस लागली असतांही शिंद्याच्या लष्करांत राहून ज्यानें शिंद्यास मदत हरप्रकारें केली, शिंदे पळत सुटले, पराभूत झाले, गिलच्यांनीं कत्तल सुरू केलीं, तरीसुद्धां, इमानास न ढळतां मराठ्यांचा पक्ष सोडून जो गेला नाहीं, तो ग्याजुद्दिन दिल्लीचा वजीर खरोखर थोर मनुष्य. शिंदेहोळकरांनीं त्याला वचन दिलें कीं, आमचे मालक पुण्याहून येताहेत, ते आले ह्मणजे त्यांजकडून तुह्मांस दिल्लीची वजीरात देववूं. पण मालक आल्यावर त्यांनीं केलें काय तर ती वजीरात नारोशंकर यांस सांगितली. कारण, त्यांस मोंगलबादशाही मोडून ब्राह्मपादशाई करावयाची होती! अथवा वचन पाळणें इत्यादिकांसंबंधानें जसें तूर्त इंग्रज प्रभूचें वर्तन

आढळतें असें कोणी कोणी ह्मणतात त्याजपेक्षां किती तरी पट जास्त उद्धट व बेपर्वाइचें वर्तन त्या वेळेस भाऊसाहेबांनीं केलें यांत संशय नाहीं. "हिंदुस्थानांत आमची अप्रतिष्ठा झाली, आपलें चालेनासें दिसोन आलें, तेव्हां हरएक मसलत आपण सांगू नये" असें शिंदेहोळकरांनीं ठरविलें तर त्यांत नवल काय? खरोखर शिंदेहोळकरांसारखे इमानी त्यांचे तेच. "स्वामीच्या नांवावरच कार्यभाग उरकून घेतों" अशी त्यांची हिम्मत, आणि स्वामीच्या नांवावरच त्यांनीं आपला दबदबा सर्व देशभर बसवून या घनघोर रणाची त्यांनीं अशी जारीनें तयारी चालविली. पण आमचा हा पानपातचा मोहरा गर्वानें फुगलेला. त्याला त्याचें कांहीं भान राहीना. शिंदेहोळकर पुण्याच्या पंतप्रधानाचे केवळ कलिजे, अपरप्राण, अशी हिंदुस्थानभर समजूत, आणि ह्मणूनच त्यांच्या सहज शब्दानें किती तरी व केवढालीं कामें उठत. पण तें कांहीं नाहीं. नशीबाचा होराच चमत्कारिक. शिंदेहोळकरांस पाण्याहून पातळ करणें यांतच भाऊसाहेबांस पुरुषार्थ मोठा वाटे. याचा परिणाम काय व्हावयाचा तो झालाच. पण शिंदे स्वामिसेवेस चोर नव्हत. इमानाचे पक्के धड. त्यांनीं वारा वाहील त्याप्रमाणें पाठ देण्याचा मनसुबा कायम केला.

इकडे दुराणी यमुना पार होता. दिवस पर्जन्याचे. यमुनेस पाणी अपरंपार आलेलें. तेव्हां नदी उतरून त्याला येतां यावयाचें नाहीं. तोंवर आपण येथें स्वस्थ कां बसावें? "सध्या कुंजपुऱ्यांत कुतुबशहा व अहमदशहा कत्तलबाज असे पंधरा हजार फौजेनिशीं बळावून राहिले आहेत. प्रस्तुत त्यांचें पारिपत्य करावें" हा विचार भाऊसाहेबांस सुचला. तसें करणें भारी धोक्याचें, दिल्ली सोडून कांहीं केल्या जाऊं नये, कारण, कोणे वेळीं प्रसंग कसा येईल याचा नेम नाहीं; आपल्या जागीं आपण हुषार रहावें

हें बरें, असा सर्वांचा अभिप्राय पडला, पण तो पसंत कोणाला व्हावा ? तुह्मांला कळत नाहीं; तुमचें ऐकावयास आह्मी येथं आलों नाहीं; सांगितल्या कामाचे तुह्मी नौकर; असें अनेक प्रकारें भाऊसाहेबांनीं शिंदेहोळकरांस वाक्ताडन केलें. सुरजमल्लजाट, इतका भाऊसाहेबांनीं दुखविला, पण इमानाचा तो भारी घड, तो ह्मणालाः—भाऊसाहेब, कुंजपुऱ्याची मोहिम बंद ठेवा. धान्याचा पुरवठा नसेल तर तो मी करतों. काळजी सोडा. पण नाहीं. बळवंत गणपत भारी थोर पुरुष आणि भाऊसाहेब मनस्वी गर्वी. सुरजमल्ल, इतकें भराभर देऊं करतो आणि असें तसें करा ह्मणून सांगतो त्याचें ऐकिलें तर आपली किंमत ती काय उरली ? आणि असल्या साधारण राजांकडून पेशवेसरकारानें मदत घ्यावी हें काय ? ही बळवंतरावाची सल्ला, भाऊसाहेबास पसंत पडली, आणि सुरजमल्लजाटाचा गोट लुटावा ह्मणजे आपणांस खूप लूट मिळेल, आपलें संकट दूर होईल आणि असें करा आणि तसें वागा ह्मणण्याची खटपट संपेल, ह्मणून बळवंत गणपतनें सुरजमल्लजाटास लुटण्याचा निश्चय कायम केला! त्याला काय ह्मणावयाचें आहे तें ह्मणण्याला, आणि त्याच्या स्वभावाला व बुद्धीला विशेषणें देण्यास तरी कोठें आमच्या मायभाषेंत शब्द विपुल आहेत ? असो. जशी भवितव्यता त्याप्रमाणें बुद्धि उपजावयाची. सुरजमल्लजाटाचा गोट, आणि तो बळवंत गणपत लुटणार ह्मणतांच, शिंदेहोळकरांस काय वाटलें असावें याची कल्पना कोणासही सहज करितां येईल. जशास तसें याप्रमाणें जाटास निमूटपणें पळून जाण्याची शिंदेहोळकरांनीं सल्ला दिली. व धरा धरा जाट पळाला, अशी बतावणी करीत शिंदेहोळकर जाटांचे पाठीस लागले. तो सुरक्षित स्थळीं जातांच काय करावें, जाट पळाला, आमचा इलाज चालेना, पाठलाग केला पण तो व्यर्थ, असें त्यांनीं भाऊ-

साहेबांस सांगितलें. अशा प्रकारें हातचा दोस्त भाऊंनीं दुस्मन् केला!

पुढें कुंजपुऱ्याची मोहिम मुकरर ठरली. तो किल्ला खणून यमुनेंत टाकीन तर नांवाचा भाऊ ही सदाशिवरावांची प्रतिज्ञा! मराठी सैन्य कुंजपुऱ्यावर टोळधाडीसारखें जाऊन आदळलें. तों, आंतून कुतुबशहा वगैरे मंडळी, छाती पुढें करून मराठ्यांशीं झुंज द्यावयास आली. पण त्यांचा दम किती? हां हां ह्मणतां मराठ्यांनीं कुतुबशहास कोंडलें, त्याच्या माणसांचा संहार चालविला. "हर! हर!!" च्या पहिल्या आरोळीसरशी कुतुबशहाच्या सैन्याची गाळण होऊन गेली. आठबारा हजार लोक कुतुबशहाचे, मराठ्यांनीं एका दिवसांत कापून काढिले. बाकीचे लढाईत ठार केले! कुतुबशहाचे पंधरा हजार लोक, पण त्यांपैकीं एक मनुष्यसुद्धां मराठ्यांनीं जिवंत सोडिला नाहीं. साऱ्यांची गर्दन उडवून दिली. त्यांच्या मुंड्यांचे ढिगारे रचून ठेविले. कुंजपुरा ओसाड केला. लूट तर किती मिळाली याचा अंदाज नाहीं. एवढें मराठ्यांचें सैन्य पण त्यांस नेतां येईना इतकी लूट कुंजपुऱ्यांत मिळाली. नजीबखान रोहिला, चांडाळ, मात्रागमनी, बेइमान नजीबखान याचा जांवई व व्याही जिवंत सांपडला. कुतुबशहाला गायकवाडानें पकडलें. दत्ताजी शिंद्याचा जव्हाहीर हत्ती कुतुबशहानें फिरवून नेला तो पुनः शिंद्याकडे आला. अशी पूर्ण फत्ते मराठ्यांस कुंजपुऱ्यांत मिळाली! दत्ताजीस लाथेनें मारून शिरच्छेद् केलेला कुतुबशहा जिवंतपणें मराठ्यांच्या हातीं सांपडला. त्याला भाऊसाहेबांकडे गायकवाडानें पाठविलें. त्याला पाहतांच भाऊसाहेबांचा संताप काय विचारावा? त्याला किती त्यांनीं गालिप्रदानें केलीं आणि काय हाल मांडले त्याचा उच्चार सुद्धां

करणें नको. शिंदे—नेकजात जवानमर्द[1] मराठागडी जनकोजी[2] शिंदे—भारी दिलदार मनुष्य. मोठा बांका शूर पुरुष आणि कट्टा स्वामिसेवक. त्यानें पुढें होऊन भाऊसाहेबांस विनविलें, भाऊसाहेबांनीं इतके वेळां अपमानिलें तरी सुद्धां प्रार्थना केली कीं कुतुबशहाला मारल्यानें दत्ताजीबुवा कांहीं परत येत नाहींत. याला प्राणदान द्या आणि गिलच्यांशीं महत्कार्य संपादा. पण भाऊसाहेब कोठें इतके शहाणे व दिलदार आणि पोक्त मनस-व्याचे. त्यांना शिंद्यांचें ह्मणणें काडीभर सुद्धां मानवलें नाहीं. जनकोजी शिंद्याचा, दत्ताजी चुलता; त्याच्या बरोबर असतांना कुतुबशहामुळें जनकोजीस हजारों प्रकारच्या मानखंडणा सोसाव्या लागल्या, त्या सर्वांचा सूड घ्यावा ह्मणून तो तडफडतो, साह्य करा, सूड घेतों, ह्मणून पेशव्यास विनवितो, आणि त्याप्रमाणें सहाय्य करावयास भाऊसाहेब आलेले, आणि त्याच शिंद्याचा सल्ला कवडीमोल ह्मणून, भाऊसाहेब, या मात्रागमन्या कुतुबशहास लघुशंका पाजून शिरच्छेदाची शिक्षा द्या ह्मणून त्रिवार गर्जितात! कुतुबशहा हत्तीवर बसला होता, त्याला महातकडून लाथेनें खालीं ढकलिलें; त्याचा शिरच्छेद, मराठ्यांच्या सेनाधिपति भाऊनें करविला! कुंजपुऱ्याचा किल्ला जमीनदोस्त करावयाचा, त्याची माती यमुनेंत टाकावयाची, ही जी भाऊसाहेबांची प्रतिज्ञा ती सुरेख रीतीनें तडीस गेली. बळवंत गणपत यांची हिम्मत भारी. भाऊसाहेबांचा प्रताप गाऊन गाऊन अगोदर पासूनच ते थकलेले आणि त्यांत ही भर. मग काय विचारावयाचें आहे? जयोत्सवानें धुंद होऊन मस्तावलेल्या अजगरासारखे मराठे कुंजपुऱ्याजवळ स्वस्थ पडले. तों इकडे, हें कुंजपुऱ्याचें वर्तमान अवदालीस कळलें;

---

१ जवानमर्द मराठेगडी (२) जनकोजी शिंदे. हें पुस्तक तयार झालेलें पहावें.

तेव्हां, त्याच्या क्रोधानलानें जो भडका घेतला तो कांहीं विचारतां सोय नाहीं. त्याला भान नाहींसें झालें. असाच जाऊन मराठ्यांचा गळा दाबूं कीं काय असें त्याला होऊन गेलें. एक दिवसांत साठ मैल मजल मारून यमुनानदीचा उतार होता तेथून पार होण्याचा अबदालीनें क्रम आरंभिला. नदी उतरून कोठें ते मराठे आहेत, त्यांस खाऊं का गिळूं असें ह्मणत अबदाली, भारी त्वेषानें यावयास निघाला. हें वर्तमान खरें कीं खोटें, याच्या शोधार्थ भाऊनें कांहीं लोक पाठविले. त्यांस शिंद्याकडच्या लोकांनीं 'स्वस्थ काय बसलां, पांच कोसांवर गिलचा आला, घोडीं एकीकडे, बसणारे एकीकडे, असे अस्ताव्यस्त बेफाम कां ?' ह्मणून भाऊसाहेबांच्या सैन्यास इषारत घाबऱ्याघाबऱ्या दिली. तो 'हीं शिंद्यांचीं माणसें, त्यांस अबदालीची दहशत बसली. शंभर कोस अबदाली असेल तर पांचकोस, ह्मणोन घावरत आले,' ह्मणून थट्टा मस्करी करितात न करितात तोंच अबदालीचें लष्कर दोन कोसांवर आलें. घोड्यांचा धुरळा उडालेला भाऊंच्या दृष्टीस पडला तेव्हां त्यांना खरें वाटलें ! ती वेळ ह्मणजे ऐषआरामीची. बेसावधपणानें मराठे अस्ताव्यस्त पडले होते. घोडे एकीकडे, लगाम दुसरीकडे तर बारगीर तिसरीकडे असा थाटमाट. आणि त्यांत असा एकाएकींच हातघाईचा प्रसंग आला. तेव्हां भाऊसाहेबांच्या जिवाची कोण त्रेधा उडाली याची वाचकांस कल्पना चांगली करितां येईल. अबदाली, मराठी सैन्याचा तळ होता तेथपासून दोन कोसांवर आला खरा, पण तुटून पडण्याचें कांहीं त्याला धैर्य होईना. मराठे बेफाम व अव्यवस्थित आहेत त्यांस या वेळीं गांठलें तर फत्ते मिळेल, संताप तर उचंबळलेला, या सर्व गोष्टी खऱ्या असूनही मराठ्यांवर तुटून पडण्यास अब-

दालीची माय विईना ! कारण मराठ्यांच्या शौर्याचा दर्प अबदालीच्या नाकांत शिरलेला !

असो. हें प्रकरण येथेंच सोडून पुढली थोडीशी हकीकत पाहूं.

---

## प्रकरण ३ रें.

**विश्वासराव**—काकू ! मला तर कांहीं हीं लक्षणें चांगलीं दिसत नाहींत. भाऊ आतां भारी अभिमानास पेटले आहेत. मी व जनकोजी यांनीं मिळून पुण्यास पत्र पाठिवलें त्याबद्दल पाहिलेंतना किती रागावले ते ? आह्मीं त्यांत काय गैर लिहिलें होतें ?

**पार्वतीबाई**—कपाळीं असेल तें काय चुकायचें आहे ? आई जगदंबा काय करील तें खरें. पण रावसाहेब, मलासुद्धां हें कांहीं चांगलें लक्षण दिसत नाहीं. वईनी सती गेल्या तेव्हांपासून माझं सारं अवसानच गेल्यासारखं झालं आहे. आई जगदंबे, आह्मां सर्वांना सुखरूपपणें नेऊन पुण्यास सोड ह्मणजे मोत्या माणकानें तुझी ओंटी भरीन. ईश्वरा, काय रे हा आह्मांवर सध्या प्रसंग आणलास. यांतून निभावणी करणार तूंच समर्थ आहेस.

**आजीबाई**—वईनी, रावसाहेब, तुह्मी असे घाबरतां कां? ईश्वरीकृपेनें आपणांस जय मिळेल बरें. उगीच असं कां घाबरावं. हीं लढाईचीं कामं, यांत असं चालायचंच, हें पेशवे सरकारचें सैन्य पुण्यप्रतापी. त्यांस कधींकाळीं अपयश कां यायचं आहे ? आह्मीं महायात्रेला ह्मणून ज्या तुमच्या बरोबर आलों त्या याच भरंवशावर ना ? मग असें तुह्मीं गांगरून हातपाय काय गाळतां ? प्रसंग लढाईचे ते असेच असणार. अखेर काय होईल तें खरें.

**विश्वास०**—आजीबाई, तुह्मी ह्मणतां तें सर्व तुह्मांला खरें वाटतें. आह्मांला कांहीं तसें वाटत नाहीं. आकारे रंगती चेष्टा- एक कुंजपुऱ्याखेरीज लक्षणें सर्व पाहिलींत ना ? गोविंदपंत बुंदेले

पैसा आणावयास गेले ते तिकडेच गडप ! त्या बिचाऱ्याचें शिर त्या मात्रागमनी अबदालीनें भाऊसाहेबांस नजर केलें आणि निरोप काय पाठवितो, तुमची तयारी करावयास स्वर्गांत पुढें रवाना झाले आहेत !

**पार्वतीबाई**—पण इकडून त्याला कांहीं उत्तर गेलं ना ?

**विश्वास०**—हो गेलं ह्मणजे ? भाऊसाहेबांनीं साफ लिहिलें कीं "तो जागा सर्वत्रांचा आहे. प्रस्तुत तुह्मी थोर. खंदावरचे पातशाहा, तुह्मी तेथें जाल तेव्हां तुमचे स्वरूपाप्रमाणें मान झाला पाहिजे. ह्मणून तुमचे मेजवानीस पुढें गोविंदपंत बुंदेले साहित्यास गेले आहेत."

**आजीबाई**—कायतरी बाई आमच्या भाऊसाहेबांची ही चतुराई ? आमचा बाळा आहे नाहीं, तो कुठं त्यांच्यांशीं चारदोन शब्द बोलला न बोलला तोंच खाडकन् त्यांनीं सांगितलं, हा मोठा कारस्थानी फडणीस होईल कीं भारी चतुर पुरुष.

**पार्वतीबाई**—पण रावसाहेब ! तुला कसं काय वाटतं ? आमची होईल ना फत्ते ?

**विश्वास०**—फत्ते होईल हो ! त्याची कुठं आह्मांला काळजी आहे. धर्म क्षत्रियांचा पत्करला; मग काय जयापजयाची आह्मी पर्वा करितों. असेल समशेर फत्ते तर मिळवूं जय आणि गिलच्या काय आभाळ फाडून आला आहे ? त्याची काय तुह्मी इतकी पर्वा बाळगतां ? देऊं उडवून—कीं—

**पार्वतीबाई**—तर मग असें घरीं घाबरणें, घटकाभर चैन नाहीं, अन्न तुटलं, झोंप येईना, वसावसा अंगावर येतात नी हें कां ? मी तर पाहतें कुंजपुऱ्यापासून कीं त्यांचं सारंच मान फिरलेलं.

**आजीबाई**—ह्मणजे कायहो वहिनीबाई तुमचं असं बोलणं ? युद्धाचीं कामं ह्मणजे तुह्मी काय पोरखेळ समजतां ? पुरुषांची

काळजी पुरुषांनाच ठाऊक बरं. पण रावसाहेब, कालपर्वांचं कांहीं जास्तकमी वर्तमान आहे ?

**पार्वती०**—जास्त वर्तमान कसलं ? नारोशंकरांनीं इकडे खजीना पाठविला, तो ह्मणे चूकभुलीनें गिलच्यांच्या छावणींत गेला ! दुष्काळांत कायसं ह्मणतात नाहीं तेरावा महिना, तशांतली गत.

**आजीबाई**—आतां दुष्काळ मोठा वाईट आपल्या छावणींत पडला आहे. जिकडेतिकडे हाकाहाक उडाली आहे. काय देवाजीच्या मनांत आहे कोणास ठाऊक !

**पार्वती०**—मला तर तेंच संकट आहे. आजीबाई, कांहीं ह्मणा, हीं कांहीं चांगल्यांतलीं लक्षणं नव्हत बरं. दक्षिण सोडून आह्मी येऊन असं रानावनांत पडलों आहों. त्या गिलच्यांशीं गांठ. जात मेल्यांची भारी अर्बुद. कसा वखत ईश्वर आणील याचा काय नेम ? आह्मी पुण्याहून निघालों कोणत्या प्रकारें आणि आतां पहा काय दशा चालली आहे ती ? काय ह्मणतात दिल्लीला परत सुद्धां जातां येत नाहीं ! सभोंवतालीं गिलच्यांनीं गराडा दिला आहे. अन्नपाण्याची रसद अशी तोडूं लागले, तरी रावसाहेब, कशी रे पुढें निभावणी ? बाळा, नाहीं हा चांगला परिणाम व्हावयाचा ! भावोजी, बाई, दादासाहेब तिकडे इतक्या लांब पल्ल्यावर आणि देवा आह्मीं कसे इकडे इतकें लांब ! कांहीं नाहीं तरी सहा महिन्यांचा पल्ला. आणि ह्मणतात सारं हिंदुस्थाननीहिंदुस्थान फिरलं आहे. परवां नाहींका जनकोजी आपल्या पराभवाची हकीकत सांगत होता ? काशीबाई आणि भागीरथीबाईसारखी तर नाहीं माझी आणि मुलीची अवस्था व्हायची ? देवा, अब्रू राखणारा, चुडेदान देणारा, बाबा तूं समर्थ आहेस. नकोस या वेळीं आह्मांवर डोळे वटारूं. आमचा पाठिराखा हो ! इतकं सैन्य तुझ्या भरंवशावर असं आलं आहे.

आमची नाहीं तर त्यांची तरी तुला कीव येऊं द्या! आजीबाई, कसं हो आतां पुढें होईल? माझ्या तर पोटांत भडभडून येतं?

**विश्वासराव**—काकू, अशा घाबरतां कां? अहो आह्मी काय शूर मर्द नव्हेंत? मी एकटा हा सारा गिलच्या कापून काढीन. तुह्मांला कां त्याची काळजी? भाऊसाहेबांसारखा एक तरी योद्धा कुठें कोणास आढळला आहे? ते असल्यावर आपण हो कां असें भ्यावें? नका डोळ्यांतून पाणी काढूं. आह्मी असतांना तुह्मांला भीतीचें काय कारण? उद्यां पहाल तर खरी माझी समशेर, हजार पांचशें गिलची कापीन तेव्हां जेवण आणि खाण, झाली आतां पराकाष्ठा. काय होईल तें होईल. सर्वच गोष्टी काय आपल्या मनाजोगत्या सदासर्वदां होत असतात? तोळा मासा आहेच चाललेला. पण तुह्मीं मात्र खातरजमा बाळगा कीं ह्या गिलच्याला बुडविल्याशिवाय कांहीं भाऊसाहेब सोडीत नाहींत, माझाही निर्धार तोच. आह्मी क्षत्रिय. यश मिळवूं तरच आमच्या जन्माचें सार्थक, नाहीं तर आह्मी जन्मून काय कुळाला बट्टा लावावयाचा?

**आजीबाई**—शाबास रावसाहेब! धन्य तुला प्रसवणारी आई! पाहिलंत ना वइनीसाहेब, कसं यांचं बोलणं आहे तें? वाघाचींच पोरं तीं. नाहीं तर आमचा बाळा मेला मुलखाचा भितरा. इथं बंदुक उडाली, तिथं इतके ठार झाले. अमक्याच्या छाप्यांत तमका गेला ह्मणून सदा रडकथा गात मेला बसलेला.

**पार्वती०**—आजीबाई, रावसाहेबांचं तें ठीकच. आधींच ते पुरुष, त्यांतून क्षत्रिय, पेशवे पुण्यप्रतापी. पण तुह्मी कांहीं ह्मणा; मला कीं नाहीं सारं विपरीत दिसतं. कायसं ह्मणतात ना "मन चिंती तें वैरि न चिंती" पोटाला अन्न मिळेना, लष्कर सगळं जि-

वावर उठलं, उपासमारीनं बेजार झाली, सभोंवतीं कोंडून घेतलं, खजीना संपला, पुण्याहून पाठपुरावा येण्याचें लक्षण कांहीं नाहीं. सगळे एक जागा गाठून बसले! याचा कायहो अर्थ? परमेश्वरा दीनदयाळा, आतां तुलाच बाबा आमची करुणा आली तर! कशाला इकडे आलोंना आपण कोण जाणे! [illegible] कांहीं झालं तर आजीबाई कशी आमची स्थिति होईल याची कांहीं तुह्मांला कल्पना? तें नाहीं पाहिलं कुंजपुऱ्यांतलें भयंकर कृत्य, रक्ताच्या नद्या हो वाहिल्या; जिकडेतिकडे मढींचमढीं. नको ग बाई ती आठवण.

**विश्वास०**—पण मोडलीना या अविंधांची आह्मीं खोडकी. आजीबाई, आठहजार पठाण, रोहिला, मुसलमान, जिवंत कापून काढिला वरें! तीच स्थिति मीं सांगतों या गिलच्यांची होईल. आमच्या काकू भित्र्या. लौकर घाबरतात! अहो काय गिलच्यांची बिशाद आहे आह्मांपुढें छाती वर करून उभें रहाण्याची? पहिल्या तडाक्यासरशी देऊं उडवून हरामखोरांची गर्दन. पळत सुटतील तोंडें काळीं करीत, तासा अर्धतासाच्या आंत. त्यांची कां तुह्मी अशी काळजी करितां? तुह्मी काकू, कांहींएक वेडेंवाकडें मनांत ह्मणून आणूं नका. भवितव्यता असेल तसें घडतें. आमचें तुमचें कांहीं एक तिथें चालावयाचें नाहीं. रडून ढेकून कां कांहीं व्हावयाचें चुकतें? असेल सलामत आमच्या समशेरीला तर गिलची नाहीं गिलच्याचा बाप आला तरी त्याची आह्मांला काळजी नाहीं! मर्द आहोंत कां काय थट्टा आहे. गिलची गिलची तो काय? होता कीं नव्हता असें करून टाकूं!

**पार्वती०**—रावसाहेब, तूं ह्मणतोस तें मला खरं नाहीं रे वाटत. देवा, नको निष्ठुर होऊं. आह्मीं इकडे येऊन पडलों, आमचा हा मुलुख नव्हे; आमचं नाहीं कोणी येथें, सर्व काय

तो देवा तूंच बरं आतां आमचा! आमची लाज तुला असूं दे! देवी जगदंबे, माते पहा आमच्याकडे एकदां सदयपणानें.

आजीबाई—वइनीसाहेब, तुह्मी अशा अधिऱ्या कां? ईश्वरावर ठेवा भार आणि होतं तें पहा. तो दयासागर आहे. आज चारपांच लाखांचा का तो एकदम घात करणार आहे? सगळ्यांवरच कां तो निष्ठुर होईल? भलतंच कांहीं तरी. नका मनांत भलतंसलतं आणून संकटांत पडूं.

विश्वास०—मीही तेंच ह्मणतों! आधीं काय ह्मणून काळजी, आणि आतांच आमचा पराभव होतो किंवा झाला असें तर नाहींना? अहो देऊं समशेरीनें गिलच्यांचीं चराचर शिरें उडवून. कुंजपुऱ्याची गर्दी तशी ही पानपत कर्नोलची, असें समजा. असे आह्मीं थोडे पेंचांत आलों ह्मणून काय झालें? आमचें लष्कर गिलच्यांस खरोखर भारी आहे बरें.

पार्वती०—रावसाहेब, तूं ह्मणतोस तें मलाही खरं वाटतं. पण नाहीं बरं त्यानं माझं समाधान होत. हीं मेलीं स्वप्नं आणि चिन्हं बघ सगळीं वाईट. आणि लष्करांत उपासमार पाहातोसना तूंच कशी चालली आहे ती? करायला जावं ती मसलत कशी अगदी फसते. अरेरे बिचारे गोविंदपंत, खजीना गोळा करावयास गेले ते परत ह्मणून आले नाहींत; नारोशंकराकडून खजीना आला तो शत्रूंच्या गोटांत गेला. शिंदेहोळकरासारखे सरदार दुखविले; बळवंतराव तर मेले. खावयाला अन्न मिळेना अशी पाहतोसना लष्करची स्थिति? मागं जातां येत नाहीं आणि पुढें शिरतां येत नाहीं. असा लष्करचा कोंडमारा झालेला पाहून ते भांबावल्यासारखे दिसतात. त्यांना चैन पडेना; आणि तूं ह्मणत होतास त्या तहाचं रे काय झालें?

विश्वास०—छेः तहाचें बोलणें फिसकटलें. आणि तह कोण

वावरं उठलं, उपासमारीनं बेजार झाली, सभोंवतीं कोंडून घेतलं, खजीना संपला, पुण्याहून पाठपुरावा येण्याचें लक्षण कांहीं नाहीं. सगळे एक जागा गाठून बसले! याचा कायहो अर्थ? परमेश्वरा दीनदयाळा, आतां तुलाच बाबा आमची करुणा आली तर! कशाला इकडे आह्मांला आणलं कोण जाणे! भलतंसलतं कांहीं झालं तर आजीबाई कशी आमची स्थिति होईल याची कांहीं तुह्मांला कल्पना? तें नाहीं पाहिलं कुंजपुऱ्यांतलें भयंकर कृत्य, रक्ताच्या नद्या हो वाहिल्या; जिकडेतिकडे मढींचमढीं. नको ग बाई ती आठवण.

विश्वास०—पण मोडलीना या अविंधांची आह्मीं खोडकी. आजीबाई, आठहजार पठाण, रोहिला, मुसलमान, जिवंत कापून काढिला बरें! तीच स्थिति मीं सांगतों या गिलच्यांची होईल. आमच्या काकू भित्र्या. लौकर घाबरतात! अहो काय गिलच्यांची बिशाद आहे आह्मांपुढें छाती वर करून उभें रहाण्याची? पहिल्या तडाक्यासरशी देऊं उडवून हरामखोरांची गर्दन. पळत सुटतील तोंडें काळीं करीत, तासा अर्धतासाच्या आंत. त्यांची कां तुह्मी अशी काळजी करितां? तुह्मी काकू, कांहींएक वेडेंवाकडें मनांत ह्मणून आणूं नका. भवितव्यता असेल तसें घडतें. आमचें तुमचें कांहीं एक तिथें चालावयाचें नाहीं. रडून ढेकून कां कांहीं व्हावयाचें चुकतें? असेल सलामत आमच्या समशेरीला तर गिलची नाहीं गिलच्याचा बाप आला तरी त्याची आह्मांला काळजी नाहीं! मर्द आहोंत कां काय थट्टा आहे. गिलची गिलची तो काय? होता कीं नव्हता असें करून टाकूं!

पार्वती०—रावसाहेब, तूं ह्मणतोस तें मला खरं नाहीं रे वाटत. देवा, नको निष्ठुर होऊं. आह्मीं इकडे येऊन पडलों, आमचा हा मुलुख नव्हे; आमचं नाहीं कोणी येथें, सर्व काय

तो देवा तूंच बरं आतां आमचा! आमची लाज तुला असूं दे! देवी जगदंबे, माते पहा आमच्याकडे एकदां सदयपणानें.

आजीबाई—वइनीसाहेब, तुह्मी अशा अधिऱ्या कां? ईश्वरावर ठेवा भार आणि होतं तें पहा. तो दयासागर आहे. आज चारपांच लाखांचा का तो एकदम घात करणार आहे? सगळ्यांवरच कां तो निष्ठुर होईल? भलतंच कांहीं तरी. नका मनांत भलतंसलतं आणून संकटांत पडूं.

विश्वास०—मीही तेंच ह्मणतों! आधीं काय ह्मणून काळजी, आणि आतांच आमचा पराभव होतो किंवा झाला असें तर नाहींना? अहो देऊं समशेरीनें गिलच्यांचीं चराचर शिरें उडवून. कुंजपुऱ्याची गर्दी तशी ही पानपत कर्नोलची, असें समजा. असे आह्मीं थोडे पेंचांत आलों ह्मणून काय झालें? आमचें लष्कर गिलच्यांस खरोखर भारी आहे बरें.

पार्वती०—रावसाहेब, तूं ह्मणतोस तें मलाही खरं वाटतं. पण नाहीं बरं त्यानं माझं समाधान होत. हीं मेलीं स्वप्नं आणि चिन्हं बघ सगळीं वाईट. आणि लष्करांत उपासमार पाहातोसना तूंच कशी चालली आहे ती? करायला जावं ती मसलत कशी अगदी फसते. अरेरे बिचारे गोविंदपंत, खजीना गोळा करावयास गेले ते परत ह्मणून आले नाहींत; नारोशंकराकडून खजीना आला तो शत्रूंच्या गोटांत गेला. शिंदेहोळकरासारखे सरदार दुखविले; बळवंतराव तर मेले. खावयाला अन्न मिळेना अशी पाहतोसना लष्करची स्थिति? मागं जातां येत नाहीं आणि पुढें शिरतां येत नाहीं. असा लष्करचा कोंडमारा झालेला पाहून ते भांबावल्यासारखे दिसतात. त्यांना चैन पडेना; आणि तूं ह्मणत होतास त्या तहाचं रे काय झालें?

विश्वास०—छेः तहाचें बोलणें फिसकटलें. आणि तह कोण

करणार? आपल्याला नाहीं तें पसंत आणि तो जमावयाचाही पण नाहीं. काकू, तुह्मी आपले जागीं बिनधास्त रहा! आणि आज सगळे सरदार भाऊसाहेबांचे डेऱ्यावर मसलत पुसावयास येणार आहेत, मलाही तिकडे गेलें पाहिजे. जातों.

पार्वतीबाई—रावसाहेब, जातों ह्मणतोस तर जा. पण आमची अब्रू बचावे असें करा बरं. उगीच नका तुटून पडूं. ईश्वर आपणांस पाठिमोरा झाला असें वाटतें. संभाळून वागा. माझ्या डोळ्यांचं पाणी कसें तें ढळेना. रात्रंदिवस चैन नाहीं. ईश्वर कोपला! देवा, अब्रू तरी आमची राख, बाबा. जगदंबे, माते, तुला मी हात जोडतें, आमची करुणा येऊं दे!

विश्वास०—तुह्मी नका काळजी करूं ह्मणतों ना? किती झालें तरी आह्मी क्षत्रिय पडलों. तुह्मीही वीरपत्नी—क्षत्रियास उचित असें वागलें पाहिजे. समशेर हातांत घेतली त्याच वेळीं मृत्यूस पाठीवर खडा उभा केला! त्याला कोठें का भिऊन चालतें? काय होईल तें होईल, ही समशेर पाहूं कसें काय करते ती. मारतां मारतां मरायचें. आलाच निर्वाणींचा प्रसंग तर येईल मागाहून पाहतां? तुह्मी नका उगीच रिकामी काळजी करूं. जातों तर मी आतां डेऱ्याकडे.

आजीबाई—आज डेऱ्यावर काय दरबार भरावयाचा आहे? लढाईचं ठरतं वाटतं?

विश्वास०—होय. आज काय तो पक्का बेत ठरावयाचा आहे.

पार्वती०—आई जगदंबे, आह्मां सर्वांची निभावणी करणारें तूंच आहेस आतां! बरं आहे रावसाहेब जा बाबा तूं आतां तिकडे जातों ह्मणतोस तर. पण ऐकलंस ना? मी कांहीं आतां मागंबिगं रहायची नाहीं हो! तुमचा हत्ती उभा तिथं माझा हवा. बघूं दे मला रणसंग्रामाचें कौतुक. तुझ्या शेजारींच मी आपला हत्ती

उभा करीन. नाहीं तर ह्मणाल मागं रहा, आणि तें असं करा आणि तस्सं होईल. आलों आहोंत खरं मग कां त्याचं. मी लढाईत तुमच्या बरोबर असणार.

विश्वास०—बरें त्याचें काय इतक्यांत आहे? पुढला विचार पुढें बघतां येईल तें मागाहून.

इतकें बोलल्यानंतर विश्वासराव भाऊसाहेबांच्या डेऱ्याकडे गेले. तेथें जाऊन बसल्यानंतर इकडल्यातिकडल्या चार गोष्टी होतात न होतात तों लगेच एकामागून एक सरदार भाऊसाहेबांकडे येऊं लागले. येऊन बसल्यानंतर, आतां पुढील मनसुबा कोणत्याप्रकारें पार पाडावयाचा, याबद्दल बरीच भवति न भवति झाली. "कसेंही करा. पण भाऊसाहेब आह्मांस उपाशीं मरूं देऊं नका. समशेरीचें मरण येईल तर मुक्ति मिळेल ही तरी आशा आहे. या उपासमारीनें 'इदं च नास्ति परं च न लभ्यते' अशी स्थिति होऊन दक्षिण सोडून आह्मी इकडे आलों ती उमेद व्यर्थ गेली ह्मणून हळहळ सुटते. यास्तव सोक्ष किंवा मोक्ष काय तो एकदाचा होऊंद्या. बेहत्तर आहे. पराजय झाला तरी पण शत्रूला एकदां तरी समशेर दाखवूं. आज सात दिवस सारखा उपासमार पडत आहे." असें सर्व लहानथोर सरदार ह्मणूं लागले. त्या वेळींची भाऊची स्थिति कोण भयंकर झाली असेल बरें? "ईश्वरा, मी कोणत्या उमेदीनें हिंदुस्थानावर आलों? माझी हिम्मत केवढी? माझा भरंवसा किती होता? हा वेळपर्यंत सर्वांस शुद्ध कस्पटाप्रमाणें त्या उमेदीवर, त्या हिम्मतीवर आणि भरंवशावर, मानीत आलों. कोणाची खातरजमा क्षणभर सुद्धां केली नाहीं. सारी दुनया मला पोरखेळ वाटे, इतका मी जयोत्सवाच्या खात्रीनें दंग झालों होतों; काय मनसबे, केवढाले घांट आणि कोण उमेद! पण त्या सर्वांचा आतां

कांहीं तरी उपयोग आहे काय? मागला पुढला विचार किंवा भीति यांनीं, माझ्या या दगडासारख्या दुर्भेद्य छातीस काडीभरसुद्धां स्पर्श केला नाहीं; मी सदाशिवरावभाऊ आणि त्यावर या हिंदुस्थानांत पराभव होण्याचा समय गुदरेल, त्याला अनिर्वाच्य आणि अपरिहार्य अडचणी प्राप्त होतील. त्यामुळें क्षणमात्र हें निधडें भाऊचें मन भांबावेल, त्याला कांहीं सुचेनासें होऊन भीति, संकट, पेंच यानें बेजारीस आल्यामुळें त्याला जिवाचा कंटाळा येईल, एकापेक्षां एक चढेल असे गहजब गुदरून त्याच्या मनाचा अविनाशी उत्साह भंग पावेल, बायकापोरें, आप्त इष्ट वगैरेंस आपण होऊन आणि आपल्या हातानें मृत्यूच्या जबाड्यांत व त्या मृत्यूपेक्षांही अतिदुःसह अशा अपमानराशीवर हाकून देण्याचा वखत कट्टया दुस्मानावर न येवो असा अतिवाईट प्रसंग गुदरेल असें एकदां तरी मनास वाटलें काय? नाहीं, कध्धीं कध्धीं नाहीं. आणि हे जगन्नियामका, काय रे हा मजवर सध्यांचा प्रसंग आणलास? सारा गिलची ठार बुडवीन तेव्हांच तुह्मांला तोंड दाखवीन; मला जाऊंद्या तर खरें, ह्मणजे उडवितों गिलच्यांची गर्दन; माझें नांव ऐकलें कीं पुरे, मातींत तोंडें खुपसावयाला हा गिलची पळत सुटेल? माझ्या सारख्याला हिंदुस्थानची मोहीम हा केवळ पोरखेळ, जाऊं तर द्या ह्मणजे हिंदुस्थाननीहिंदुस्थान कापून काढितों, अशीं वाक्यें नानासाहेब, राघोबा आणि वईनी यांजवळ मी बोललों, आणि त्याच तोंडानें आतां कशी निभावणी लागेल, ह्मणून आपल्या सरदारांस केवळ अजीनपणानें मी विचारूं काय? शिंदेहोळकर, जाट अशा सारख्यांस वेळोवेळीं धुडकावून लाविलेल्या भाऊनें, त्यांनाच आतां कांहीं तरी युक्ति सांगा, या संकटांतून पार पाडा असें विनवावें! दिल्लीपतीचें तख्त फोडून तेथें "ब्राह्मपाच्छाई" मिरविलेल्या भाऊला दिल्लीकरांच्या हलकट अ-

कांहीं तरी उपयोग आहे काय? मागला पुढला विचार किंवा भीति यांनीं, माझ्या या दगडासारख्या दुर्भेद्य छातीस काडीभरसुद्धां स्पर्श केला नाहीं; मी सदाशिवरावभाऊ आणि त्यावर या हिंदुस्थानांत पराभव होण्याचा समय गुदरेल, त्याला अनिर्वाच्य आणि अपरिहार्य अडचणी प्राप्त होतील. त्यामुळें क्षणमात्र हें निधडें भाऊचें मन भांबावेल, त्याला कांहीं सुचेनासें होऊन भीति, संकट, पेंच यानें बेजारीस आल्यामुळें त्याला जिवाचा कंटाळा येईल, एकापेक्षां एक चढेल असे गहजब गुदरून त्याच्या मनाचा अविनाशी उत्साह भंग पावेल, बायकापोरें, आप्त इष्ट वगैरेंस आपण होऊन आणि आपल्या हातानें मृत्यूच्या जबाड्यांत व त्या मृत्यूपेक्षांही अतिदुःसह अशा अपमानराशीवर हाकून देण्याचा वखत कट्टया दुस्मानावर न येवो असा अतिवाईट प्रसंग गुदरेल असें एकदां तरी मनास वाटलें काय? नाहीं, कध्धीं कध्धीं नाहीं. आणि हे जगन्नियामका, काय रे हा मजवर सध्यांचा प्रसंग आणलास? सारा गिलची ठार बुडवीन तेव्हांच तुह्मांला तोंड दाखवीन; मला जाऊंद्या तर खरें, ह्मणजे उडवितों गिलच्यांची गर्दन; माझें नांव ऐकलें कीं पुरे, मातींत तोंडें खुपसावयाला हा गिलची पळत सुटेल? माझ्या सारख्याला हिंदुस्थानची मोहीम हा केवळ पोरखेळ, जाऊं तर द्या ह्मणजे हिंदुस्थाननीहिंदुस्थान कापून काढितों, अशीं वाक्यें नानासाहेब, राघोबा आणि वईनी यांजवळ मी बोललों, आणि त्याच तोंडानें आतां कशी निभावणी लागेल, ह्मणून आपल्या सरदारांस केवळ अजीनपणानें मी विचारूं काय? शिंदेहोळकर, जाट अशा सारख्यांस वेळोवेळीं धुडकावून लाविलेल्या भाऊनें, त्यांनाच आतां कांहीं तरी युक्ति सांगा, या संकटांतून पार पाडा असें विनवावें! दिल्लीपतीचें तख्त फोडून तेथें "ब्राह्मपाच्छाई" मिरविलेल्या भाऊला दिल्लीकरांच्या हलकट अ-

मीरउमरावांनीं कोंडलें, त्यांतून निभाव लागणें कठीण, असा प्रसंग आला, ह्मणून, अखबरनवीस लिहतील, पांढऱ्यावर काळें करून ठेवितील असें कसें वागूं ! पुण्याच्या पुण्यप्रतापी पेशव्यांचा जरिपटका सर्वत्र नाचवावा ह्मणून आणिला आणि तो गुंडाळून ठेवण्याचा आलेला वखत डोळे उघडून मी कसा पाहूं ! मोठ्या ईर्षेनें व पराकाष्ठेच्या हिम्मतीनें शत्रूस पायांखालीं तुडवून टाकूं, ह्मणून गर्जना करीत माझ्यासभोंवती गोळा झालेल्या अडीच तीन लक्ष लोकांस मृत्युमुखांत मी आपल्या हातानें टाकूं, कीं करूं तरी काय ! ” अशा मनोविचारांनीं क्षुब्ध झालेलें भाऊ-साहेबांचें हृदय, कल्पनाउपनेत्र लाविल्याशिवाय दिसावयाचें नाहीं; किंवा त्या उपनेत्रांचा उपयोगही व्यर्थच. कारण कल्पनेला तरी जीवन हवें व रहावयाला स्थळ पाहिजे. आह्मां महाराष्ट्रीय मंडळीचा सौभाग्यकाल सरून दुर्धर वैधव्यावस्था तूर्त प्राप्त झाली आहे. अशा स्थितींत त्या कल्पनेला उपासमारीशिवाय अन्य काय मिळणार ? ह्मणजे तात्पर्य काय कीं, कल्पनेनेंसुद्धां ती त्या वेळची भाऊसाहेबांची स्थिति ताडतां यावयाची नाहीं ! आमच्या पुण्याईचा हा जबरदस्त पुण्यप्रताप ह्मणावयाचा ! फक्त सव्वाशें वर्षांपूर्वीं आपल्या पूर्वजांनीं केलेल्या पराक्रमाची कल्पना सुद्धां करण्यास असमर्थ असे सत्पुत्र आह्मीं निपजलों ह्मणजे वाघिणीच्या थानाशीं मेंढरें लचकूं लागलीं. अशांतला प्रकार प्राप्त झाला !

भाऊसाहेब—सदाशिवरावभाऊ पेशवा, असा इतक्या क-चाटींत सांपडला, कल्पना नाहीं अशा संकटांनीं त्याला घेरलें, दुःखाची परमावधि ज्याला ह्मणतात ती स्थिति त्याला भरपूर प्राप्त झाली, ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं नकोत ते प्रकार आपो-आप घडून येऊं लागले, तरी मुळीं, तिळभरसुद्धां, डगमगला

नाहीं बरें. काय त्या पुरुषाची छाती, कोण त्याचें निश्चल धैर्य, आणि कसली त्याची हिम्मत. वर सांगितलेली विचारशृंखळा रखडत मनावरून चालली न चालली तों इतक्यांत "बरें आहे, यार हो ! उद्यां लढाई ही द्यावयाचीच. मारूं कीं मरूं, कांहीं तरी एक उद्यां निश्चित. बिनधास्त व बिनघोर तुह्मीं आपापल्या ठिकाणीं जा. प्रहररात्र उरली कीं कुचाचा नगारा होईल. सायंकाळीं शिधासामुग्री पोंचती करितों. आजवर मीठ खाल्लेंत त्याची परीक्षा उद्यां आहे. तुमचे वाडवडील, आजेपणजे स्वर्गांतून तुमच्या शौर्याचें, धैर्याचें, व युद्धकौशल्याचें कौतुक पाहण्यास उद्यां जमणार आहेत. हें विसरूं नका ! नांवाचे तुह्मीं मराठे, जातीचे हिंदु. सांप्रत हा दुराणी, अविंधांचा राजा, खंदारचा पातशाह तुह्मांला शेळयामेंढरें करीन, हिंदूंचे मुसलमान बनवीन, जिवंतांचीं प्रेतें करून सोडीन ह्मणून आला आहे. पहा कांहीं त्याची तुह्माला खंत, लाजलज्जा असेल तर. जास्त बोलण्याची वेळ नव्हे. नगाऱ्याबरोबर कुच करण्याची तयारी ठेवा." अशी आपल्या लष्करास भाऊंनीं ताकीद दिली, आणि लगेच उद्यां कसाकाय मनसुबा करावयाचा याबद्दल विचार चालविला. भाऊसाहेबांच्या मतें आपण व्यर्थ येथें कोंडून घेतलें, हें कांहीं बरें झालें नाहीं. मोकळें रान मिळेल तर आपला कांहीं तरी निभाव लागेल. ह्मणून दिल्लीच्या रोखें निघून जावें असा त्यांनीं विचार कायम केला. तो शिंदेहोळकरांस पसंत पडेना. अशी निभावणी होईल तर बरें, त्यांत नुकसान व्हावयाचें नाहीं. पण आपणांस गराडा देऊन बसलेला अबदाली फळी फोडून जाऊं देतो थोडाच, असें त्यांचें मत होतें. पण तें ध्यानास कोण आणतो ? मराठ्यांचें सैन्य या प्रसंगीं भारी अडचणींत सांपडलें होतें. दिल्लीचा रस्ता सोडला तर पलीकडे भयंकर दाट

झाडी. अलीकडे गिलची, पलीकडे यमुनानदी. मग भाऊसाहेबांनीं बेत कायम केला कीं, दिल्लीरोखें निघून जावें. वाटेंत गिलचा येईल तर त्याच्याशीं झुंज देऊन रस्ता मिळवावा. त्यांनीं लगेच इब्राइमखान गारद्यास बोलावून आणिलें; आणि त्यास ह्मटलें इब्राइमखान, हा पाहतांना प्रसंग! आमचें सैन्य दिवसेंदिवस झडत चाललें; शत्रूच्या सैन्याला पाठपुरावा होत आहे; आह्मीं असें एक जागीं कोंडून घेतलें; कुजत मरण्याचा हा प्रसंग ईश्वरानें आह्मांवर आणिला; कांहीं उपाय तुह्मांला सुचत असेल तर बोला, वखत तर वाईट दिसतो!

इब्राइम०—खाविंद, इकडे यावयाचे वेळींच तुमचें आमचें इमानप्रमाण झालें आहे. आतां दुसरा भेद आमच्या तुमच्यांत नाहीं. बंद्यास हुकूम करा, तो पार पाडण्याला तयार आहे.

भाऊ०—शाबास. तुह्मी इमानाचे धड, ह्मणून तर या वेळीं तुह्मांस मीं बोलावून आणिलें तेंच इमान कायम ठेवा आणि या वेळीं तुह्मांस कळेल ती सल्ला द्या. त्यांत प्रतारणा नको. प्रस्तुत माझा काल फिरला आहे. ईश्वर, परवरदिगार याचा मजवर कोप दिसतो. भरंवसा तुमचा फार ह्मणून हें तुह्मांस सांगतों. ईश्वरानें असा गहजब करावयाचा नव्हता. पण त्याची मर्जी; तुह्मांवर आतां सर्व मदार आहे.

इब्राइम०—मालकसाहेब, हा इब्राइमखान गारदी सेवेस चोर नव्हे. इमान अशांतलें नाहीं. हीं पहा दुराणीकडून मला आलेलीं पंचवीस पत्रें "तुह्मी आह्मी एक जात आहों. या समयीं आह्मांकडे यावें. ह्मणजे तुह्मांस पंचवीस लक्षांचा मुलूख देऊं. पातशाही उमरावी देतों." असा यांत मजकूर आहे. सरकार आपण हीं वाचून पहा. हीं दुसरीं पत्रें नजीबखानाचीं. हें घ्या सुजाउद्दौल्याचें. हीं आल्यास महिना झाला. आतां या बंद्याच्या इमानाची हुजूरनीं खातरजमा करून घ्यावी!

भाऊ०—इभ्राइमखान, धन्य तुमची. नेकजातपणा ह्मणतात तो याला. तुमच्यासारखीं माणसें पदरीं असल्यावर काळजी कोणती करावी. माझे शिंदेहोळकरही असेच इमानी; पण त्यांचा मीं बहुत आजवर उपमर्द केला. त्यांची सल्ला ऐकली नाहीं. असो. झाल्या गोष्टी परत येत नाहींत! ह्मणून ह्मणतों, इभ्राइमखान, या वेळीं पुढें मनसुबा कोणता करावयाचा?

इभ्राइम०—मालकसाहेब, "तुह्मी गनीमलोक; तुह्मांस हिम्मत पुरणार नाहीं. रणांत आह्मांस सोडून जाल. आह्मांस मात्र मृत्यूनें गांठलें आहे." यास्तव कोणत्याही प्रकारचा सल्ला देणें कठीण वाटतें. आपणच सल्ला कायम करा, तो मला कबूल आहे.

भाऊ०—हें कां बोलतां इभ्राइम खां? तुह्मीं आह्मांस इमानप्रमाण दिलें तेंच आमचें. "तुह्मी जेथें उडी टाकून उभे रहाल तेथें आह्मीही कत्तल होऊन जाऊं. परंतु रण सोडून जाऊं हें घडणार नाहीं." हें घ्या आमचें इमानप्रमाण. आतां तर कांहीं नाहींना शंका? मग बोला तुमची काय सल्ला आहे ती?

इभ्राइम०—सरकार, आतां फक्त एक उपाय आहे. "हरयलें दिल्लीस पोंचावें. गोल बांधून मध्यें बुणगें घालावें व भोंवताला अराबा वांटून द्यावा. चोहोंकडे चार मातबर सरदार देऊन जिकडील तिकडे बाजवा वांटून द्याव्या. आणि कोस दोन कोस लढत भांडत दिल्लीस जाऊन पोंचावें." मग पुढील मसलत पुढें पाहतां येईल. असें कराल तरच निभाव लागेल, नाहीं तर येथें कत्तल झाल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं!

हें बोलणें भाऊंस पसंत पडलें आणि त्याप्रमाणें सर्वत्रांस ताकीद देऊन, पहाटे प्रहर रात्रीस, अशा थाटानें कुच करावयाचें, हा बेत मुकरर केला. शिंदेहोळकर यांस इभ्राइमखानांची मसलत मनःपूर्वक आवडली. आतां कदाचित् आपली निभावणी

झाली तर होईल असें त्यांस वाटलें. रात्र बरीच झाली तेव्हां प्रातःकालच्या कुचाची तयारी करण्यास सर्व लष्कर लागलें.

नर्मदानदीखालील प्रांतांतील मराठे आपल्या हिंदुलोकांच्या कदीम दुस्मनांचें व आर्यभूस अनेक प्रकारें नाडून तिच्या सारखा छळवाद शतक दोन शतकें मांडलेल्या नराधमांच्या क्रूर कर्माचें सुरेख शासन करावें, त्यांचा निःपात करून आपल्या देशाची गेलेली अब्रू व मलीन झालेला लौकिक मिळवावा या अलौकिक इच्छेनें गेले; व दैवदुर्विलासामुळें आणि केवळ अपरिहार्य कारणानें व दैवाधीनच्या गोष्टी प्रतिकूळ झाल्या ह्मणून कठीण, अति दुस्सह अशा पेंचांत ते अडकले होते, त्यांच्या छावणीमध्यें ता. ७ जानेवारी सन १७६१ चा दिवस उगवण्यापूर्वीं सुमारें एक दोन तास रणवाद्यांचा गजर सुरू झाला. आतां उठा, कुच करा, सर्व एकत्र जमा, असें फर्मावणाऱ्या नगाऱ्यांच्या ध्वनीनें आकाश गजबजून गेलें! त्या दिवशींचा सूर्यनारायण—सहस्ररश्मी दिवाकर, क्षितिजावर हळहळ येतो न येतो तोंच आमच्या प्राणप्रिय महाराष्ट्रभूचें "पयःपान" केलेले शूर पठ्ठे, रणधुरंधर वीरनायक, जवानमर्द शूर शिपाई, पानपत कर्नोलच्या समरभूमध्यें मोठ्या थाटाचा "विवाहसमारंभ" आहे, तेथें थाटामाटानेंच गेलें पाहिजे, शुभ पोषाख व चिन्हें धारण केलीं पाहिजेत, तें मृत्यूचें स्थान नव्हे, ईश्वरी प्रसाद व अक्षय्य स्वर्गवासाचें साधन अशा समजुतीनें तयारी करूं लागले. स्वकार्य, स्वामिसेवा, आपला मान, आपल्या पूर्वजांचा लौकिक, आपली इभ्रत, आपली करामत इत्यादि सद्गुणसर्वस्वाचें त्यांस बाळकडू लहानपणापासून मिळालेलें व त्यांच्या शरिरांत खेळणाऱ्या रक्तांत—इमान, तेजस्वीपणा, करामत, कर्तबगारी, शौर्य, धैर्य, काटकपणा, परार्थपरायणता, स्वजनकल्याणेच्छा, निर्लेपबुद्धि वगैरे—

मनुष्यमात्रास अवश्य असणाऱ्या गुणांचें दाट व फार मिश्रण झालें असल्यामुळें, कुच करण्याच्या इशाऱ्यांसरशीं जाण्यास—चाल करून निघण्यास ते तयार झाले! मंगलप्रसंगीं अवश्य मानली जाणारी हळद पाण्यांत कालवून ती त्यांनीं आपल्या तोंडावर लावून घेतली. डोक्यावरील पागोट्याचा पदर मानेवर लोंबत सोडला, घोडे सज्ज करून कुलस्वामिणीचें नांव घेत ते त्यांजवर स्वार झाले. आणि विघ्ननाशक गणपतीचें साहाय्य मागत मोठ्या उल्हासानें, भारी उमेद दाखवीत एकत्र जमून बाहेर पडण्याच्या बेतांत ते होते; तों इतक्यांत पांढऱ्या सफेत घोड्यावर स्वार झालेला महा तेजस्वी व मोठा इर्षेबाज खमक्या योद्धा सदाशिवरावभाऊ, भरधांव घोडा टाकीत "यारहो! आजचा समय निर्वाणीचा; निमक खाल्ल्याचें, थोर कुळांत जन्मल्याचें, समशेर हातीं धरल्याचें, मराठे, गनीम, ह्मणविल्याचें आणि महाराष्ट्रदेशांत जन्मास आल्याचें आज सार्थक व्हावयाचें आहे. आपल्या नातवांपणतवांच्या आंगीं काय करामत आहे ती पाहूं ह्मणून वर बघा तुमचे वाडवडील आकाशांत उभे राहून बघताहेत. त्यांच्या नांवांस नामोहरमी न येई असें करा, पेशवेसरकारची अब्रू आज तुमचे हातांत आहे; आपल्या गादीचा मान राखा." वगैरे प्रोत्साहनपूर्वक भाषणानें उमेद आणण्यासाठीं इकडून तिकडे आणि तिकडून इकडे विजेसारखा चमकत होता. "भगवंता, नारायणा, कुलस्वामिणी, तुझें नांव घेऊन आह्मी आपल्या धन्याच्या, आजवर अन्नवस्त्र देणाऱ्या आमच्या मायबापाच्या कार्याकरितां स्वतःच्या जिवाची, प्राणाची, शरीराची काडीमात्र काळजी न बाळगतां, साक्षात् मृत्यूवर चालून जात आहों. ईश्वरा, तुझ्या भरंवशामुळें आह्मांला कशाची बिलकुल पर्वा वाटत नाहीं; तूं आमचा जन्मदाता, संरक्षणकर्ता, परमात्मा जगन्नायक, दयासागर, करुणार्णव, ह्मणून आमच्या जिवाची, आमच्या प्राणाची किंवा कशाची आ-

ह्मांला काडीभर सुद्धां काळजी बाळगणें नको. आमचा तूं कल्याणकर्ता; तुझ्याहातून आमचें अकल्याण होणार नाहीं. अपराध आमच्या हातून घडले असतील त्यांची क्षमा कर. आह्मी अनाथ, आह्मी निराश्रित, आह्मी तुझ्यापुढें केवळ क्षुद्र-कस्पट समान, यास्तव आमचा सूड घेऊं नको. आमचें शासन करण्याची ही वेळ नव्हे. पदर पसरतों, करुणा भाकतों, क्षमस्व क्षमस्व ह्मणतों. दयाघना, कारुण्यभावानें आह्मांला या वेळीं साहाय्य कर." "देवा, आतां आमची काळजी, आमची लाज तुला. आईबाप, बायकापोरें, इष्टमित्र यांस अंतरवूं नको, आह्मांवर निष्ठुरता दाखवूं नकोस" इत्यादि प्रकारें ईश्वरास विनवीत. व "आई, बाबा, आतां तुमची आमची भेट कसची? ईश्वरानें निर्वाण समय दाखविला. आतां यांतून आपण कसचे पार पडतों. सर्वांच्या भेटीस मुकलोंच, बायकापोरें उघडीं पडलीं, त्यांची भेट अंतरली! मनच्या तमाम आशा जिरल्या! एकंदर बेत आतां जेथल्या तेथेंच. उमेद गळाली, बंदुकीची गोळी, का समशेरीचा घाव, का भाल्याचा मार, यांतून कशानें प्राण जाईल तो न कळे; व्यर्थ अभिमानाला पेटलों; लटका उपद्याप मांडला, रिकामी उठाठेव केली आणि असे फसलों" ह्मणून प्रथमतः हळहळत व नंतर लगेच "उंः, त्यांत काय? मृत्यु हा आज नाहीं उद्यां आहेच. तो कांहीं चुकत नाहीं. आपण हंतरुणावर पडून मरत आहों थोडेच. मरूं तर साधुसंत, बैरागी, नानाप्रकारच्या देहदंडनानें मिळवूं ह्मणतात ती मुक्ति आह्मांस अनायासें मिळेल. आणि एकटे आह्मी मेलों ह्मणून काय गेलें? आमच्या लोकांला जाच करणारे, आह्मांस पशूसारखे वागविणारे, आमच्या डोळ्यांदेखत अनन्वित कृत्यें करणारे, आह्मांस लुबाडणारे, शिरजोर, हलकट अशांचा कांटा तरी या देशांतून निघेल. आणि एवढ्या एका कुटुंबाचा

सोडून शंभर कुटुंबांचा घात झाला ह्मणून काय बिघडलें ? तेव्हां तें कांहीं नव्हे, मरण आलें तरी पत्करलें, पण शत्रूंचा पराभव करावयाचा, त्यांना हुसकून लावावयाचें. आपल्या धन्याचा झेंडा मिरवावयाचा, यांत काडीभर अंतर पडूं द्यावयाचें नाहीं." असा निश्चय करीत आमचें मराठे लष्कर, हळू हळू पानपत कर्नोलरोखें निघून दिल्लीचा मार्ग धरूं लागलें. सदाशिवरावभाऊ, घोड्यावरून धांवतां धांवतां जनकोजी शिंदे होते तेथें आले आणि ह्मणाले "शिंदे, आजचा निदानीचा प्रसंग. तुमच्यावर भरंवसा भारी आहे. झाल्या गोष्टी मनांत आणूं नका. इमानपूर्वक झटून गिलचा ठार बुडवा. असें करणें नसेल तर घ्या समशेर आणि आधीं भाऊचीच गर्दन उडवा !" ह्मणून त्यांनीं मान पुढें केली तों जनकोजीस तें दुःख मरणसम झालें. "भाऊसाहेब, हें काय बोलतां. हा जनकोजी शिंदा आहे. स्वामीचे जोडे पडतील त्या ठिकाणीं हें माझें डोकें पडलें ह्मणून समजा. त्यांत अंतर येईल तर जयाप्पाच्या पोटीं जन्मल्याचें सार्थक कोणतें ? तों इतक्यांत अबदालीनेंही युद्धाची तयारी केली. मराठे निकरानें बाहेर पडले असें पाहतांच अगोदर त्याचें धाबें दणाणलें. दम पुरासा निघेना. "आजचे दिवस झुंजास तहकुबी करावी. सल्ल्याचें बोलून ठीक करितों. उतावळी न करणें" ह्मणून "ते समयीं अबदुल अल्लीकडील वकील भाऊंकडे आले." मराठे या वेळीं भारी खवळलेले, त्यांना काय तो एकदांचा सोक्षमोक्ष होऊन जाऊं दे असें झालेलें. त्यामुळें वकील आला त्याचा उपमर्द करून तो परत जातो न जातो तों इतक्यांत मराठ्यांनीं एकदम अबदालीवर गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. दोनशें तोफा मराठ्यांकडे होत्या त्या त्यांनीं एकदम डागल्या आणि शत्रूंच्या सैन्यावर आगीचा भडिभार उडवून दिला. अगोदर बेत ठरला कीं, गोल धरून मध्यें बुणगें घालावयाचें आणि दुराणीची एक फळी तोडून मार्ग मिळवीत दिल्लीकडे जा-

वयाचें. पण ऐन प्रसंग येतांच तो बेत जागच्याजागींच राहिला. मराठे अतिशय त्वेषाला पेटलेले. कसा एकदांचा शत्रूचा निःपात करूं असें झाल्यानें ऐन वेळीं पूर्वींच्या बेताचें त्यांस भान राहिलें नाहीं. दंड ठोकून समोर उभे राहिले. तेव्हां इब्राइमखानास फार वाईट वाटलें. "रात्रौ भाऊसाहेब यांनीं मनसबा केला काय, आणि कर्तव्य हें केलें काय! आतां मसलतीस धक्का पुरता बसला. उपाय अवघाच राहिला. आह्मीं भाऊसाहेब यांस इमान दिलें आहे त्यापक्षीं आतां मागें पुढें पहावें तरी आपले पूर्वजांस बोल लागेल. भाऊसाहेब जें करतील त्यास सादर न होतां तर गत नाहीं. दैवीं असेल तसें घडेल. परंतु रणांत विन्मुख व्हावयाचें नाहीं." असा विचार करीत इब्राइमखानानें आपल्या घोड्यास टांच मारली आणि भाऊसाहेबांपुढें येऊन ह्मटलें. "आपल्या हाताखालचे शिपायांस महिन्याच्या महिन्यास पगार देण्याविषयीं मीं आग्रह केल्याबद्दल तुमची बहुत दिवस मजवर इतराजी आहे. या महिन्यांत तुमचा खजीना लुटला गेला ह्मणून आह्मांस बिलकुल पगार मिळाला नाहीं. परंतु तें मनांत आणूं नये. आह्मी पगार घेण्यास योग्य असल्याशिवाय इतके दिवस घेतला नाहीं. अशी आज तुमची खात्री करून देईन." आणि लगेच सलाम करून 'सरकारचा झेंडा सरकवा, पुढें सरकवा, आणि समशेरी खेंचून गिलच्यांची कत्तल सुरू करा' असें ओरडत तो आपल्या टोळीसह गिलच्यांवर तुटून पडला.

अबदालीच्या एका टोळीवर इब्राइमखानाचा हल्ला सुरू होतांच मराठी सैन्य क्रमवार बाजू धरून उभें राहिलें. अगदीं मधोमध खास हुजरातीचें सैन्य, भाऊसाहेबांचा १ हत्ती, दुसरा

---

१. अवतरणांतर्गत वाक्यें सारीं काव्येतिहाससंग्रहांतून घेतलीं आणि हें मात्र काशीराजाच्या बखरींतलें आहे.

विश्वासरावांचा आणि तिसरा पार्वतीबाई, विश्वासरावाची बायको, आजीबाई नानाफडणीसाची आई व दुसऱ्या इतर बायका यांचा. पानपत कर्नोलचें भयंकर युद्ध आणि त्यामध्यें ब्राह्मणांच्या–अति श्रीमानांच्या–बायका हत्तीवरच्या अंबारींत बसून युद्धकौतुक पहावयास आलेल्या ! त्यावेळच्या आणि आतांच्या बायकांत अ-मुक अंतर आणि तें अशातशानें झालें वगैरे प्रकारचे उद्गार काढण्याला अवकाश नाहीं; कारण तिकडे दोन्ही सैन्यांत तुंबळ युद्ध चालून एकच गर्दी उसळली ती कल्पनेनें पाहण्या इतपत धैर्य तरी सुदैवानें अद्याप आमच्यांत आहे ह्मणून तिकडील मन इकडे येत नाहीं !

मराठ्यांकडील मातबर सरदार, सिंहाचे सिंह जनकोजी शिंदे, इब्राइमखान गारदी, दमाजी गाईकवाड, विठ्ठल शिवदेव हे–अं-गांत चेव आल्यासारखे होऊन खुप संतापानें भुकेलेला वाघ, शिकार पाहतांच चवताळून झाप टाकतो तसे–दुराणीच्या सैन्यावर तुटून पडले ! तिकडून अबदालीचे लोकही तसेच. त्यांनीं आपल्या युद्धकर्माची पराकाष्ठा होती नव्हती तेवढी करून पाहिली. पण निभाव लागण्याचें कांहीं चिन्ह दिसेना. खवळलेले मराठे सरदार घटकोघटकीं पुढें पुढेंच सरकताहेत, नहून अणुभरही मागें पाय घेईनात. असें पाहतांच, गिलच्यांच्या सैन्याचा धीर सुटला. आतां पळ काढूं तरच वांचणें शक्य असें समजून गिलचे मागें अफगाणिस्थानाकडे पळावयास लागले. हें हुजुरातीच्या सैन्याला दिसलें मात्र, तों, अंबारींत बसून युद्ध करणारा विश्वासराव "अरे, आणा मला एक घोडा, करतों या शत्रूचा आतां पाठलाग, गोविंदपंत बुंदेले यांस ठार केलेला आईतखाउ मुख्य वजिराचा मुलगा पळत सुटला आहे, त्याच्या नरडीचा घोंट मला घेऊं द्या." असें ह्मणत अंबारींतून उतरून खासा स्वारी घोड्यावर आरूढ

झाली. आणि इतर मराठे शिलेदार आपापले घोडे घेऊन–पळाला आमचा दुस्मन्, मिळाली आह्मांस फत्ते, इत्यादि जयघोष करीत व आनंदसूचक आरोळ्या देत–गिलच्यांच्या पाठीमागें लागले. गिलचे पळत सुटले ते कांहीं केल्या माघारे परतेनात. तेव्हां अबदालीचा मुख्य वजीर स्वतः पायउतारा होऊन पळत सुटलेल्या आपल्या सैन्यास विनवूं लागला, कीं "दोस्तहो, आपला देश फार दूर आहे, तुह्मी कोठें पळतां?[1]" परंतु तें ऐकणार कोण? जो तो धुम पळत सुटलेला. अमक्याकडे साहाय्य माग, तमक्याजवळ तोंडें वेंगाड, असे प्रकार वजिरानें पुष्कळ केले. पण कोठें कांहीं थांग लागेना. मराठ्यांची लघट पाठीस भिडलेली. तींतून निभावणी लागणें कठीण; हरामजादा नजीबखान, ही आणीबाणीची वेळा पाहून ह्मणाला "आजचे लढाईत कळकळीचा मनुष्यं असा काय तो मीच एक आहें, बाकीचे सरदार मौज पहाणारेच आहेत." अबदालीच्या मुख्य वजिराचें तर धाबें इतकें दणाणून गेलें कीं, त्यानें काशीराजा नामक हिंदु वकिलाबरोबर सुजाउद्दौल्यास निरोप पाठविला कीं, "तुह्मी मला लौकर मदत न केली तर मी प्राणास मुकेन." ह्मणजे तात्पर्य एवढेंच कीं, आमच्या मराठी सैन्यानें गिलच्यांस समर सोडून पळावयास लाविलें आणि एक दोन तास असाच अनुकूळ काळ असता तर जयश्री मराठ्यांसच वरती.

आपला पराभव झाला. मराठे पाठलाग करिताहेत, हें खुद्द अबदालीस कळतांच त्याचीही चांगली पांचावर धारण बसली, पण तो पुरुष भारी निधड्या छातीचा. लढाईच्या कामांत पुरा पटाईत आणि चांगला मुरलेला असून शिवाय मोठा प्रसंगावधानी.

---

१. येथून अवतरणांतर्गत वाक्यें काशीराजाच्या बखरींतलीं होत.

त्यानें "निकर्फची[1] ह्मणजे आपले खास बारदार बोलाविले आणि त्यांपैकीं दोन हजार येऊन पोंचल्यावर त्यांस हुकूम दिला कीं, तुह्मांस जे हत्यारबंद लोक आढळतील त्या सर्वांस लढाईंत मदत करण्यास्तव हांकून आणावें आणि लढाईंतून जे जे लोक पळून जात असतील त्यांस गांठून त्यांपैकीं शत्रूवर हल्ला करण्यास्तव परत येण्याचें जे जे कबूल करतील त्यांस पुढें घालून आणावें व जे जे नाकबूल करतील त्यांस तेथेंच ठार मारून टाकावें." याचा परिणाम असा झाला कीं, चार पांचशें लोक ठार करण्याबरोबर पळत सुटलेलें बारा तेरा हजार सैन्य परत आलें आणि एवीं मरणार तेवीं मरणार तर शत्रूचा तरी कां सूड न घ्यावा ह्मणून आपआपल्या समशेरी, निकरानें पाठलाग करीत सुटलेल्या मराठयांवर, हाणूं लागलें. विश्वासराव पेशवे मोठया ईर्षेनें हर! हर! असा गंभीर जयघोष करीत, पळत सुटलेले गिलची कापावयाच्या धांदलींत होते. आज काय ईश्वरानें आपणांस यशस्वी केलें, इतके दिवस कुचंबलों, त्याचा सूड घेऊं वगैरे प्रकारच्या उमेदीनें प्रफुल्लित झालेली त्यांची उल्हासवृत्ति एकाएकीं अगदीं म्लान झाली. हातघाईस येऊन गिलची सैन्यावर बेफामपणानें प्रळय उडवून सोडीत असतां एकाएकीं शत्रूकडील सैन्यांतून आलेली एक गोळी त्यांच्या छातींत बसली. तों लगेच दुसरीही बगलेंत शिरली. मग काय विचारतां खालीं धाडकन विश्वासराव पडले. शिव! शिव! काय ईश्वरीकोप? विश्वासराव पडले पडले ह्मणतात तों लगेच खिजमतगारानें तें प्रेत उचललें. उचलतां उचलतां एका दुराणी सरदारानें विश्वासरावांच्या मानेवर भाला खुपसला. तरी तिकडे न पाहतां खिजमतगारांनीं तें प्रेत विश्वासरावांच्या अंबारींत नेऊन ठेविलें आणि वर शालजो-

---

१. काशीराजाची बखर. ( लोकहितवादीकृत )

डीचा पदर घातला. इकडे पार्वतीबाई, सदाशिवरावभाऊंची बायको, जयश्री आपणांकडे कितपत आली वगैरे पाहण्यासाठीं अंबारीमधून डोकावीत होती–तों विश्वासरावांच्या अंबारींत शालजोडी पांघरून निजलेलें कोणी तिला दिसलें. आणि आपल्या नवऱ्याचा मारा, हाणा, बडवा, तुडवा वगैरे प्रकारचा हलकल्होळ ऐकूं येत होता तो कां ऐकूं येईना ह्मणून विश्वासरावांची बायको हळूच दुसऱ्या बाजूनें अंबारीकडे वगैरे टक्क लावून पहात होती. कांहीं मागमूस लागेना तेव्हां तिच्या हृदयांत भीतीनें बिऱ्हाड ठेविलें. पार्वतीबाईनें आपला हत्ती विश्वासरावांच्या हत्तीजवळ नेवविला आणि विश्वासरावांच्या महातास विचारिलें "आंत कोण निजलें आहे" "सरकार, छोटे श्रीमंत." ह्मणतांच "कां?" ह्मणून पुनः त्याला हटकिलें. "ठार झाले." असा महाताकडून जबाब मिळाला मात्र तों लगेच त्या अंबारींत दुःखाचा हलकल्होळ भडकला! आठ तास दिवस झालेला. खाणेपिणें कांहीं नव्हतें. सूर्याचा ताप डोक्यावर, आगीच्या भडाका जोरजोरानें अंगावर येत, गोळ्या, तोफा ताडताड उडून पडताहेत, अशा समयाला बायकांना पुरता शोक करण्याला तरी कोठली फुरसत. तेव्हां त्या शोकाग्नींत करपून गेलेल्या बायकांनीं कोण भयंकर विलाप मांडला असेल? तो काय सांगून संपावयाचा आहे? "देवा! अखेर आह्मांवर कोपलासच तूं! रावसाहेबासारखें रत्न हरपल्यावर आह्मीं आपलीं तोंडें आतां कोणास दाखवावींत! लढाईंत शत्रूला काळ वाटणारा कसा काळानें उचलला हो!" इत्यादि एकका दोन ह्मणून विलाप सांगावयाचे आहेत. आणि ते त्या धांदलींत ऐकूं तरी कोणास जाणार! भाऊसाहेब गिलच्यास धुडकावीत सुटले होते. तों बायकांच्या अंबारींत "शंखध्वनी" करून विलाप चाललेला

शिंद्याच्या कानीं आला. क्षणभर आपली समशेर थांबवून जनकोजी अंबारीजवळ येऊन पाहतो तों विश्वासराव ठार ह्मणून विलाप चाललेला. त्यानें उभ्याउभी थोडेंबहुत सांत्वन केलें आणि लगेच तेथून घोडा उडवून तो नजीबखान रोहिल्यास कापून काढण्याच्या तयारीस लागला. वाटेंत भाऊसाहेब भेटले. 'कां जनकोजी, मागें कां परतलां होतां, नजीबखानाशीं चाललेलें झुंज मध्येंच कां सोडलेंत?' असें त्यांना विचारिलें, तेव्हां ईश्वर कोपला, श्रीमंत ठार झाले. असें खिन्नपणें मोठ्या दुःखानें जनकोजी बोलला; तोंच भाऊंची कंबरच खचली, "देवा! शिव! शिव!!' असे त्यांनीं उद्गार काढले. इतक्यांत दुराणी, पुढें लगट करून मराठ्यांवर निकरानें तुटून पडावयास लागले. इब्राइमखानाचा भाचा ठार झाला. खुद्द इब्राइमखान भारी जखमी होऊन धरणीस पडला! भाऊसाहेबांस कांहींएक सुचेना. पळत सुटलेले दुराणी परत आले आणि निकरानें कोसळूं लागले. यामुळें सगळा भार भाऊसाहेबांवर येऊन पडला. कारण बरेच अघाडीस ते सरकले होते. विश्वासराव ठार झाले, आतां कसें पुण्यास तोंड दाखवावें! नानासाहेब काय ह्मणतील! जय मिळाला तरी आपणांस जिवंत राहतां येणें कठीण! असा विलाप करतात तोंच गिलची, मराठ्यांस मागें हटवूं लागले. इब्राइमखानाची बाजू घसरली. भाऊसाहेब क्षणमात्र चकित झाले. पळत सुटलेले लोक जिवावर उदार होऊन तुटून पडूं लागले, तेव्हां आपल्या सैन्याची अवस्था काय पुसावी! आकाश फाटल्यासारखें त्यांस झालें. महापुराचा लोट अंगावर यावा असा प्रकार गिलच्यांनीं केला. तें पाहतांच भाऊसाहेबांस आपला निर्वाणसमय खास आला असें वाटलें.

दुर्दैवानें त्यांतच हात साधण्याची तयारी केली. मराठ्यांस

एकाएकीं दुराणीची उसळ असह्य वाटून त्यांनीं थोडासा पाय माघारा घेतला. त्यासरशी गिलच्यांस दुप्पट स्फुरण चढलें. दुप्पट जोराची दुसरी उसळ दुराणी घेतात न घेतात तों मराठे मागें पळूं लागले. त्यांस कांहीं दम निघेना. मल्हारराव होळकराचा नजीबखान धर्मपुत्र. त्याच्यावर तरी दुराण्यांचा गहजब इतका कोसळावयाचा नाहीं, असें जाणून भाऊसाहेबांनीं त्याला ह्मटलें, "मल्हारराव, बायका कबीले संभाळून दिल्लीस पोंचवा अगर शत्रु आलेच अंगावर तर त्यांस ठार करून अब्रू न जाई असें करा. आतां आमच्या जिवाची आशा नाहीं. गिलच्या तरी ठार व्हावा एक किंवा आह्मीं तरी कत्तल व्हावें एक. विश्वासराव तों ठार झाले. तुह्मी आमची आतां आशा सोडा. फक्त बायका कबीला संभाळा ह्मणजे पुरे." असें अर्धेंपुरें बोलणें होतें न होतें तोंच घोड्यास टांच हाणीत "हाणा, हाणा, मारा, मारा" अशा शब्दघोषानें सदाशिवरावभाऊ गर्दींत घुसले, तों इकडे कुल सैन्य धास्तीनें पळूं लागलें. "हाणा हाणा" ह्मणावयास सुद्धां अवसान न येई अशी भाऊंची स्थिति झाली. पळत सुटलेलें सैन्य परतविण्यासाठीं भाऊंनीं होती नव्हती तितकी पराकाष्ठा केली. पण त्याचा कांहीं उपयोग होईना. शेवटीं शहाजणें वाजवावीं ह्मणजे आपली फत्ते झाली असें जाणून पळत सुटलेलें सैन्य परतेल आणि उभें असलेलें पळणार नाहीं, अशी भाऊंनीं युक्ति योजिली. पण तिचाही उपयोग होईना. एवढें लष्कर भगव्या झेंड्यासभोंवतीं जमलेलें पण सायंकाळच्या सुमारास भाऊ, जनकोजी, समशेरबहादर, इब्राइमखान गारदी, विठ्ठल शिवदेव वगैरे सरदार आणि दुसरे पन्नासएक लोक यांखेरीज झेंड्यापाशीं कोणी नाहीं! दुराणी सडकून धांवत येत असतां हे पन्नास जण छाती पुढें सारून "हर हर" करीत समशेरी हाणीतच आहेत, हा प्रकार देवदानवांच्या

युद्धांत देखील झाला नाहीं! बाकीचें वर्णन आतां पुढें काय द्यावें? अडीच लाख मराठे पानपतावर जमलेले, त्यांतील एकून-एक ठार झाले? जीव वांचवावा ह्मणून पळत सुटले त्यांचीं गर्दनें गिलची उडवीत सुटला! रुधिरोच पाट वाहूं लागले, जि-कडेतिकडे मराठ्यांचीं प्रेतेंचप्रेतें आढळत! अशा प्रसंगीं आ-मच्या पानपतच्या मोहऱ्याची काय अवस्था झाली हें सांगितलेंच पाहिजे काय? तें सांगण्याचा वखत न येता तर ही लेखणी आपणास किती भाग्यवान् समजती!

रात्रीचा काळोख पडत चालला, व तळावर पांचदहा वीर उरले, तसे गिलची कृतकृत्य होऊन परतूं लागले. सदाशिव-राव पायउतारा भ्रमिष्टासारखा होऊन वर आकाशाकडे डोळे लावीत व ईश्वराची करुणा भाकीत उभा आहे, "देवा! हा सर्व आकांत तूं डोळे उघडून पाहतोस ना! तुला दया आहे! मरा-ठ्यांची अशी ही दुर्दशा या हराम गिलच्यांनीं आणि ती सुद्धां या भाऊच्या डोळ्यांदेखत करावी, यांत तुला आनंद वाटतो ना! माझ्या एकट्याच्या ईर्षेमुळें अडीच लाख लोकांचे मुर्दे पडावेत आणि ते मीं पहावेत यापेक्षां मीच कां अगोदर कत्तल झालों नाहीं! नानासाहेब पेशव्यांचा विश्वासरावासारखा पुत्र, माझ्या अभिमा-नामुळें ठार व्हावा, माझ्या एकट्याखातर इतक्या लोकांचे प्राण जावेत, पेशवेसरकारचे असलाले सरदार कत्तल व्हा-वेत, दक्षिणच्यादक्षिण दुःखसागरांत बुडावी याजपेक्षां नारा-यणा! मलाच अगोदर मृत्यूच्या जबड्यांत टाकतास तर काय होतें! हाय हाय! हा मी चांडाळ सदाशिवराव इतक्या आकां-ताला कारण ना! हें एवढें संकट आमच्या लोकांवर म्यां ओढून आणिलें! पेशवेसरकारचा हा अपमान माझ्यामुळें झाला! ना-नासाहेबांच्या पुत्रशोकाला कारण मी! दक्षिणेंत, दुःखसागराचा

पाट फोडून लाविला मीं! सर्व दुःख, सर्व संकट, सर्व हाल, सर्व अपमान आणि सर्व कांहीं या भाऊच्या, या चांडाळ पाप्याच्या मुळें आमच्या लोकांवर ओढवलें, असें सर्व दुनया आतां ह्मणेल! तें देवा, कसेंरे मी ऐकूं! एवढें जबरदस्त शासन त्वां करावेंस असा मीं तुझा अपराध तरी कोणता केला होता! आणि मला अजूनही जिवंत ठेवतोस! काय ही तुझी निर्दयता! माझ्या मनाला आणखी किती चरके तुला द्यावयाचे आहेत! शोकाग्नीनें माझें सर्व हृदय करपून गेलें, संतापानें डोकें भणाणलें, त्वेषानें शरीराची लाहीलाही झाली! पुतण्याचें–श्रीमंत पेशवेसरकाच्या वडील पुत्राचें प्रेत आणि—माझ्या खातर–या चांडाळ नराधम भाऊखातर–आपल्या प्राणाची पर्वा न बाळगतां, आई, बाप, बंधु, सोइरे या सर्वांस सोडून माझ्यासाठीं आलेल्या लोकांचे मुडदे, अरे! हा अघोरपातकी चांडाळ भाऊ आपल्या पायांखालीं सारखा तुडवीत चालला आहे! पुण्यप्रतापी सदायशवंत पंतप्रधानाचा भगवा झेंडा आसेतुहिमाचल अबाधित फडकावा ह्मणून आपल्या शरीराचें रक्तानूरक्त ओतणारे शिंदे, होळकर, गाइकवाड, गारदी, समशेरबहाद्दर वगैरे तमाम रणधुरंधर रणांगणांत कण्हत पडलेले, त्यांचे ते स्वर या दुर्दैवी अघोरपातक्याच्या कानीं पडताहेत, तरी तो जशाचा तसाच शाबूत! हे यमधर्मा, हे मृत्यो, तुह्मीं बोलविलें नाहीं तरी आपण होऊन हा पातकी, हा चांडाळ, हा नराधम, हा कुलांतक, स्वजनघातकी भाऊ तुह्मांकडे आपण होऊन लौकरच येतो! त्याला आमंत्रणाची वगैरे आतां बिलकुल गरज नाहीं. मरावें ह्मणून केव्हांपासून त्याची सारखी धडपड चालली आहे. पण वेळ येईना. खासा दुराणीच्या नरडीचा घोट घ्यावा, मग आपोआप तुमचें बोलवणें येतेंच, पण तें कसें साधणार! आतां मुकाट्यानें मरूं काय! साधारण शिपुर्ड्यांच्या समशेरीला

भाऊनें आपली मान सादर करावयाची ! ज्या एकट्या भाऊच्या जिवावर अडीच लाख मराठे दक्षिणेंतून आले, त्या भाऊला कोणी संभाळणारा आतां नाहीं ना!" इत्यादि प्रकारच्या विलापांत कांहीं वेळ गेला न गेला तोंच आपणांस कदाचित् गिलच्यांच्या कैदेंत सांपडावें लागेल असा विचार भाऊंच्या मनांत आला. तेथल्या त्या अपमानापेक्षां मरण बरें असें भाऊंला वाटावें यांत आश्चर्य नाहीं. तेव्हां कैद होण्याच्या अगोदर आपण आपली गर्दन उडवून घ्यावी असा विचार भाऊंनीं केला ! वेळ रात्रीची, समरांगणांत भाऊ उभे होते त्या बाजूला मराठ्यांच्या मुडद्यांखेरीज चिटपांखरूंही नव्हतें. मराठ्यांचा पाठलाग करीत पुढें गेलेले दुराणी परत यावयाचे उरले होते. त्यांच्या हातीं भाऊ सांपडणार तोंच आपली गर्दन आपणच उडवून घ्यावी ह्मणून भाऊंनीं समशेर खेंचली. "जगदंबे, आई, आई भवानी, हा दुर्दैवी भाऊ तुझ्यापुढें पदर पसरतो. आजवर अपराध घडले त्यांची क्षमा कर. त्या अपराधांचें भयंकर शासन भरपूर मिळून चुकलें आहे, येवढ्यावरच माते, तुझा कोप शांत होवो."—असें ह्मणतो न ह्मणतो इतक्यांत एका दुराणीनें हळूच मागून येऊन भाऊच्या पाठींत भाला खुपसला ! आणि त्यानें पुढें येऊन ह्मटलें "तुह्मी कोणी सरदार आहां किंवा खुद्द भाऊच आहां ? तुह्मी भिऊं नका. तुह्मी सांगाल तेथें घेऊन जाऊं." तो साधारण यःकश्चित् शिपाई, बरोबर दोघे चौघे सोबती घेऊन मुडद्यांच्या अंगावरील दागिने वगैरे गोळा करणारा, त्याच्याशीं काय बोलावें असा विचार करून भाऊंनीं आपली समशेर त्यांपैकीं एकाच्या खांद्यावर हाणली. त्याच्या साहाय्याला दुसरा आला तों त्याचीही तीच स्थिति भाऊंनीं केली. तेव्हां भाऊच्या समशेरीनें जखमी झालेल्या दुराणीनें दुसरा भाला भाऊंच्या

१. काशीराजाची बखर.

छातींत खुपसला! तेव्हां मात्र भाऊंनीं खालीं बसकण मारली आणि हताशदृष्टीनें तोंडांतून कांहींएक अक्षर सुद्धां न काढितां ते त्या दुराण्याकडे पाहूं लागले! पाठीवरली जखमही दुःसह झाली. आणि इतक्यांत त्याच दुराण्यानें संतापासरशीं आपल्या समशेरीचा निसटता आडवा घाव भाऊंच्या मानेवर घातला! तेव्हां आमच्या पानपतच्या मोहऱ्याचें शिर आणि धड भिन्न झालें हें कांहीं सांगण्याची गरज नाहीं. पुरे आतां, नको जास्त! "हर! हर!" करीत शत्रूंच्या नरडीचा घोट घेण्यास चवताळणाऱ्या मराठ्यांच्या वंशजांनीं ही सर्व हकीकत वाचून "शिव शिव" ह्मटलें तरी पुष्कळ झालें! पण एवढें ह्मटल्यानेंच या लेखकाच्या मनाची तृप्ति होईना. त्याची दुःखभारानें वांकलेली लेखणी टिपा ढाळीत पुनः चार दोन अक्षरें काढीत आहे. वाचकांस शोकरसाचा पेला सादर करूं नये, दुःखार्णवाच्या लाटा त्यांजवर कोसळं देऊं नयेत ही त्याची प्रथमपासूनची भारी दांडगी इच्छा; पण अखिलचराचर विश्वास, इच्छामात्रेंकरून चलनवलन देणारा दयानिधि जगन्निवास मराठ्यांवर कोपलेला! त्यानें त्यांजवर डोळे वटारलेले! त्याला, मराठ्यांच्या अतिपवित्र पण महाप्रखर आणि पराकाष्ठेच्या उच्छृंखल रुधिराचें प्राशन करवून आर्यवसुंधरेस आकंठ तृप्त करावयाचें होतें. मराठे महाप्रबळ; भारतीय वीर धनंजयाप्रमाणें त्यांचा शौर्यनिधि उच्छृंखल असे; त्या सैन्यसागराच्या पर्वतप्राय लाटांमुळें आर्यभूचा सांपळा खिळखिळा होईल कीं काय, अशी जगदीशाला न जाणों दहशत बसली असेल. त्या प्रतिदिनकराप्रमाणें तेजायमान शूर पट्ट्यांचा आर्यभूस भार सहन करवेनासा झाला कीं काय न जाणों, ह्मणून असल्या अतुलप्रतापी व अपूर्व करामतींच्या रणधुरंधरांस भारतीय समरभूच्या ठिकाणीं नेऊन असा आकांत करणें ईश्वरास

आवडलें! हाय! हाय! काय दुर्धर प्रसंग तो! आमच्या माय-देशची रणधुरंधर मंडळी गिलच्यांनीं—अफगणिस्थानच्या रानगट मुसलमानांनीं—पानपतच्या समरांगणांत चराचर कापून काढावी काय! सदाशिवरावभाऊसारखा मोहरा आणि तो हलकट दुराणी चोरानें भाला मारून गळ्यांतील मोत्यांच्या हाराखातर जमिनीवर पाडावा काय! काय! ईश्वरी कौतुक हें! परंतु या कौतुकापेक्षां दुसरें अतिभयंकर दुःख अजून दाखवावयाचें आहे. पण तें दाखविण्याची छाती कोणाला व्हावी आणि तें पाहण्याइतके कठोर मनाचे प्राणी तरी कोण आहेत! पण—असो, भाऊसाहेब गर्दींत घुसले. बायकामाणसांची त्यांना पर्वा वाटेना! "नेववेल तर संभाळून न्या, नाहींतर आपल्या समशेरीनें कत्तल करा." असा भाऊसाहेबांचा हुकूम ऐकून त्यांच्या इमानी नोकरांस किंवा त्यांच्या धर्मपत्नीस काय वाटलें असावें बरें? निसटता हुकूम फमावून घोडा फेंकीत गर्दींत शिरलेल्या भाऊंकडे पार्वतीबाईनें बरीच वेळ टक लावली. आपला पति प्रतिभीष्माचार्य, सव्यसाची धनंजय, निःक्षत्रिय पृथ्वी करणारा परशुराम, तो फत्ते मिळविल्याशिवाय माघारीं परतावयाचा नाहीं. जयश्री त्याला अखेर वरणार, हा तिच्या मनींचा भरंवसा, ह्मणून ती आपली अंबारी फिरवूं देईना. "थांबा, फत्ते मिळाल्यावर सर्वच मिळून जाऊं; माझा बाळ विश्वासराव येथें पडला आहे. त्याचा सूड तरी घेतला पाहिजे! तो पाहिल्याखेरीज कोणत्या तोंडानें मी मागें परतूं!" अशा प्रकारें पार्वतीबाई आपल्या लोकांस ह्मणत आहे तों इतक्यांत मराठ्यांचें लष्कर झाडून सारें पळत सुटलें. कोणी कांहीं राहीना. भाऊ आणि दुसरे सुमारें पन्नास नेकजात खरे मर्द झेंड्याजवळ झुंजत होते. त्यांच्यावरच सर्व दुराण्यांची लाट कोसळली. भारतीय युद्धांत शत्रुसैन्य जसें अ-

भिमन्यूवर कोसळलें तशी अवस्था या वेळीं त्या मराठ्यांची झाली. नको, त्या प्रसंगाचें नुस्तें स्मरण सुद्धां नको! बाईसाहेब, या वेळीं उशीर लावूं नका, माघार घ्या; चला आपण आतांच पळता पाय काढूं तर कांहींतरी निभावणी लागेल, असें नानाप्रकारें पदरच्या मंडळीनें तिला विनविलें; पण त्या खऱ्या वीरपत्नीनें "काय तिकडे असे शत्रू कोसळून पडले आहेत, त्यांनीं शत्रूचा असा संहार चालविला आहे, कोण प्रसंग कसा येईल कोण जाणे, आणि मी माझा जीव वांचविण्याकरितां पळ काढूं? नको, मला जाऊं द्या त्या झेंड्यापाशीं. डोळे भरून तिकडील युद्धकौशल्य तरी पाहीन." त्यावर नाना फडणीसाची आई आजीबाई ह्मणाली, "वइनीसाहेब, असा अविवेक करूं नका; आपली बायकांची जात. हे मुसलमान उफराट्या काळजाचे केवळ असुर दैत्य, तुह्मांला माहीत आहे. ईश्वर सध्यां आपल्यावर कोपला. त्यानें रडें आमच्या वांट्यांस दिलें. आणि तूं असा-" पार्वतीबाईनें तिला उत्तर केलें "जाऊं द्या हो. रड्याला कुठं मी भितें! माझें सौभाग्य शत्रूशीं झगडत आहे, माझे प्राणनाथ काळाशीं भांडताहेत, माझें मंगळसूत्र तें पहा तेथें भगव्या झेंड्यापाशीं कृतांतकाळासारखें अत्युग्र स्वरूप धरून शत्रूंचा संहार करीत आहे, आणि मी त्यांची बटीक, त्यांच्या पायांची दासी, त्यांच्या प्राणावरून ओवाळून टाकलेल्या या देहाचा बचाव करावा ह्मणून त्यांना तेथें तसेंच सोडून पळत जाऊं काय? हें पाहिलेंत ना माझ्या बाळाचें, रावसाहेबांचें प्रेत, याला येथें असें टाकून कुणीकडे मरायला जाऊं? नको, मी राहतेंच येथें अशी उभी." असें ह्मणत तिनें एकदम अंबारींतून खालीं उडी टाकली आणि पायांजवळच, मुठींत नंगी समशेर घेऊन प्राण सोडलेल्या एका शिपायाचें प्रेत होतें, त्याच्या हातांतली समशेर पार्वतीबाईनें हिसकावून घेतली आणि

"ही दासी आपलें युद्धकौशल्य बघत प्राण सोडील तरी भाग्यवती समजते. आपणांवर ईश्वर कोपला आहे, शत्रूनें आपणांस घेरलें आहे; ते आपला प्राण घ्यावा ह्मणून टपले आहेत, आपण त्यांचा प्राण घेत आहां, आपल्याला कुमक कोणाची नाहीं, मी आपली अर्धांगी, आपली सहचारिणी, या वेळीं आपणांस सोडून मी कोणीकडे जाऊं!" असें ह्मणत मुडद्यांच्या राशी आणि रक्ताचे पाट तुडवीत ही ब्राह्मणस्त्री पार्वतीबाई चालली! काय धाडस! कोण पतिप्रेम! केवढी छाती! तो काळ, त्या काळचीं माणसें, त्या वेळच्या पुरुषांच्या स्त्रिया इत्यादि सर्वच कांहीं विचित्र! त्यांची बरोबरी अशी त्यांची त्यांनींच करावी. इतरांची प्राज्ञा नाहीं. श्रीमंत सौभाग्यवती पार्वतीबाई, कीं, ज्या माउलीला, सूर्याचे किरण माहीत नव्हते, जिला चार पाउलें एकटें चालण्याचें ठाऊक नाहीं, जिच्या हुकुमाची वाट मी मी ह्मणणाऱ्या शूर मर्दांनीं पहात असावी, जिला दुःखाची कल्पना कशी ती माहीत नाहीं, जिच्या जिवावर हजारों कुटुंबें पोसलीं जात होतीं, जिचा हुकूम, ती मनांत आणील तर, साऱ्या हिंदुस्थानाला मानावा लागेल, ती पार्वतीबाई, सदाशिवरावभाऊंची धर्मपत्नी, विश्वासरावाची चुलती, पुण्यप्रतापी सदायशवंत प्रधान पेशव्याची भावजय, एकटी, दुःखानें होरपळलेली, संतापानें तप्त झालेली, नंगी समशेर हातांत घेऊन प्रेतांचे ढिगारे तुडवित ईर्षेनें चालली, तेव्हां तिचें तें रूप पाहून महिषासुरमर्दिनी देवी जगदंबा चालली असाच कोणासही भास व्हावयाचा! तिनें झुंजांत जाऊं नये, दुराणीच्या हातीं सांपडूं नये, तिची इज्जत जाऊं नये ह्मणून नेकजात सरदार, मराठे खिजमतगार जळफत असतील तर त्यांत नवल तें कोणतें? पुढें येऊन ब्र काढण्याची कोणाची प्राज्ञा होईल, तेव्हां एका इमानी खिजमतगारानें सुरेखशी युक्ति लढविली. त्वेषानें पार्व-

तीबाई भाऊंकडे जावयास चालली तेव्हां दुसरीकडून तो खिज-मतगार पुढें आला आणि ह्मणाला, "बाईसाहेब, दिल्लीरोखें भाऊसाहेब निघाले, पळालेले लोक जमवीत आहेत, उद्यां दुसरें झुंज देणार, तुमचा हत्ती फिरवून आणण्यास आह्मांला फर्माविलें आहे तिकडे चला; उशीर नको; दुराणी पाठलाग करीत येईल." असें ऐकतांच "काय! दिल्लीरोखें गेले, पराभव पावले कीं काय?" हा प्रश्न करून पार्वतीबाई शोकाचा सुस्कारा टाकीत जाऊं लागली. तों पंधरावीस दुराण्यांचा तांडा पाठलाग करीत आला, हें पाहतांच पार्वतीबाईची कोण स्थिति झाली असेल याची कल्पना वाचकांसच नीट करीतां येईल. "देवा, कसारे तूं आमच्या सर्वांचा अभिमान सोडलास! आह्मांस संकटांत लोटणें तुला बरें वाटतें ना! काय ही आमच्या फौजेची दाणा-दाण! विश्वासराव ठार झाले; आमचें सैन्य पळून गेलें, किती लोकांचे प्राण गेले!

देवा, हें कसेंरे मी सोरें, डोळे उघडून पाहूं! हाय हाय! हीं बिचारीं किती तरी माणसें येथें मरून पडलीं आहेत! यांना तुड-वीत माणसांनींच जावें! आणि या इतक्या प्राण्यांस असें घोर प्रायश्चित्त कां तर ते आपल्या धन्यासाठीं आपल्या प्राणावर उ-दार जाहले ह्मणून! शिव शिव!!" असें ह्मणत आहे तोंच पाठीमागें असलेले दुराणी मध्येंच कांहीं कामसाठीं उभे रा-हिले. तेव्हां जवळील खिजमतगारानें ह्मटलें, "आईसाब, घोड्या-वरून खालीं उतरा. अंगावर असेल नसेल तीं अजबाब टाका. हे मागें येताहेत हे दुराणी लुटारू बाजारबुणगे. त्यांना हवें तें मिळालें ह्मणजे पुरे!" पार्वतीबाईनें लगेंच त्याप्रमाणें केलें. आणि ती धूम पुढें पळत जाऊं लागली! आतां याच्या पुढील जास्त हकीगत काय सांगावयाची आहे? आधींच शोकभरानें थकलेली लेखणी ही तेथेंच बसकण मारते!